
# BUDDHA AND KARL MARX

# बुद्ध आणि कार्ल मार्क्स

डॉ. बाबासाहेब आंबेडकर



# बुद्ध आणि कार्ल मार्क्स

## Buddha and Karl Marx

लेखक

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

M.A., PH.D., D.sc., LL.D., D.LITT., BARRISTER-AT-LAW

---

प्रकाशक

प्रबुध्दभारत प्रकाशन

नागपूर-27

बुद्ध आणि कार्ल मार्क्स

**Buddha and Karl Marx**

लेखक : भीमराव रामजी आंबेडकर

प्रकाशक : **प्रबुध्दभारत प्रकाशन**

पंचशील नगर, नागपूर-१७

मो. ९८५०३३२२९६

प्रथम आवृत्ती : २४ ऑक्टो. २०१२

मुखपृष्ठ : सोनू ग्राफ्रीक, नागपूर

मुद्रणस्थळ : श्रीसमर्थ ऑफसेट, नागपूर

किंमत : 20/-

# बुद्ध आणि कार्ल मार्क्स

कार्ल मार्क्स व बुद्ध यांच्यामधील तुलना विनोद म्हणूनही मानली जाईल. त्यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. मार्क्स व बुद्ध यांच्या २३८१ वर्षांचे अंतर आहे. बुद्ध इ.स. पूर्व ५६३ मध्ये जन्माला आला व कार्ल मार्क्स इ.स. १८१८ मध्ये. कार्ल मार्क्स हा एका नव्या तत्वज्ञानाचा-नव्या राज्यव्यवस्थेचा-एका नव्या अर्थशास्त्रीय पद्धतीचा शिल्पकार असल्याचे समज्यात येते. दुसऱ्या बाजूस बुद्ध हा ज्याचा राज्यशास्त्राशी वा अर्थशास्त्राशी काहीही संबंध नाही अशा धर्माचा संस्थापक, यापेक्षा आणखी कोणीही नाही, असे मानले जाते. अशा प्रदीर्घ कालखंडाचे अंतर असलेल्या व वेगवेगळी विचारक्षेत्रे व्यापलेल्या या दोन व्यक्तिंमत्वांमधील तुलना अथवा विरोध विचारर्थ मांडणारे ''बुद्ध आणि कार्ल मार्क्स'' हे या निबंधाचे शीर्षक विचित्र वाटणे स्वाभाविक आहे. मार्क्सवाद्यांना साहजिक त्याचे हसू येईल आणि मार्क्स व बुद्ध यांचा एकाच पातळीवर परामर्श घेण्याच्या कल्पनेची ते कुचेष्टा करतील. मार्क्स किती आधुनिक व बुद्ध किती प्राचीन ! मार्क्सवादी म्हणतील की, बुद्धाची त्यांच्या गुरूशी तुलना करता बुद्ध निव्वळ आदिम ठरणे क्रमप्राप्त आहे. अशा दोन व्यक्तींमध्ये कसली तुलना होऊ शकणार? मार्क्सवादी बुद्धाकडून काय शिकू शकणार? बुद्ध मार्क्सवाद्यांना काय शिकवू शकणार? काहीही असो, या दोहोंमधील तुलना आकर्षक व बोधपर आहे. दोहोंचेही वाचन झाले असल्यामुळे व दोहोंच्या तत्त्वज्ञानात रस असल्यामुळे त्यांच्यातील तुलना करण्याचे काम माझ्यावर येऊन पडते. जर मार्क्सवाद्यांनी त्यांचे पूर्वग्रह मागे सारले आणि बुद्धाचा अभ्यास केला व त्याची भूमिका काय होती हे समजून घेतले तर मला खात्री वाटते की, ते त्यांचा रोख बदलतील. बुद्धाचा उपहास करण्याचे त्यांनी ठरवले असल्याने ते त्याची

प्रार्थना करू लागतील अशी अपेक्षा करणे अर्थात अवाजवी होईल. परंतु एवढे मात्र म्हणता येऊ शकेल की, त्यांनी दखल घ्यावी असे, त्यांच्या योग्यतेचे बुद्धाच्या शिकवणुकीतून काहीतरी आहे, हे त्यांच्या लक्षात येईल.

## १. बुद्धाचा सिद्धान्त

सर्वसाधारणपणे बुद्धाचा अहिंसेच्या तत्त्वांशी संबंध जोडण्यात येतो. त्याच्या शिकवणुकीचा तो आदि व अंत असल्याचे मानले जाते. बुद्धाने शिकवले ते अहिंसेच्याही फार पलीकडचे, अत्यंत व्यापक आहे, हे क्वचितच कोणाला माहीत असेल. म्हणून त्याची तत्त्वे तपशीलवार मांडणे आवश्य आहे. त्रिपिटकाच्या वाचनातून मला जी तत्त्वे समजली ती मी खाली नमूद करीत आहे :-

१. स्वतंत्र समाजासाठी धर्म आवश्यक आहे.

२. प्रत्येक धर्म स्विकारण्यासारखा असतोच असे नाही.

३. धर्माचा जीवनाच्या तथ्यांशी आणि वास्तविकतेशी संबंध असला पाहिजे. त्याचा ईश्वर किंवा आत्मा स्वर्ग किंवा पृथ्वी यांविषयीच्या सिद्धांतांशी व कल्पनांशी संबंध असता कामा नये.

४. ईश्वराला धर्माचा केंद्रबिंदू मानणे अयोग्य आहे.

५. आत्म्याची मुक्ती हा धर्माचा केंद्रबिंदू मानणे चूक आहे.

६. प्राण्यांचा बळी देणे हा धर्माचा केंद्रबिंदू मानणे चूक आहे.

७. खरा धर्म माणसाच्या मनात बसत असतो, शास्रात नव्हे.

८. मनुष्य व नीती हा धर्माचा केंद्रबिंदू असला पाहिजे. जर तसे नसेल तर धर्म ही एक क्रूर अंधश्रद्धा ठरेल.

९. जगात ईश्वर नसल्यामुळे नीती ही केवळ जीवनाचा आदर्श असणे पुरेसे नाही तर जीवनाचा नियम अथवा कायदा असावा.

१०. धर्माचे कार्य जगाची पुनर्रचना करणे व त्याला सुखी बनविणे हे आहे, त्याचा आरंभ वा अंत यांचे स्पष्टीकरण करणे नव्हे.

११. हितसंबंधांच्या कलहामुळे जगात दुःख आहे व तो सोडवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे अष्टांग मार्गाचे अनुसरण होय.

१२. संपत्तीची खाजगी मालकी एका वर्गाला सत्ता तर दुसऱ्या वर्गाला दुःख देते.

१३. समाजाच्या भल्यासाठी ह्या दुःखाचे कारण दूर करून ते नष्ट केले जाणे आवश्यक आहे.

१४. सर्व मानव समान आहेत.

१५. माणसाचे मूल्यमापन त्याच्या जन्माने नसून त्याच्या कर्तृत्वाने होते.

१६. महत्त्वाचे काय तर उच्च आदर्श; उच्च घराण्यातील जन्म नव्हे.

१७. सर्वांबद्दलची मैत्री अथवा मित्रत्व कधीच सोडता कामा नये. आपण त्यासाठी आपल्या शत्रूचे देखील ऋणी असले पाहिजे.

१८. प्रत्येकाला विद्या प्राप्त करण्याचा, अध्ययन करण्याचा हक्क आहे. माणसाला जगण्यासाठी जशी अन्नाची आवश्यकता आहे त्याप्रमाणे विद्येचीही आवश्यकता आहे.

१९. सदाचरणाशिवाय ज्ञान हे घातक होय.

२०. कोणतीही गोष्ट अंतिम (अस्खलनशील) नाही. कोणतीही गोष्ट कायम बंधनकारक नाही. प्रत्येक गोष्ट चौकशी व परीक्षण यांस पात्र आहे.

२१. कोणतीही गोष्ट अंतिम नाही.

२२. प्रत्येक गोष्ट कार्यकारणाभावाच्या नियमाला धरून आहे.

२३. कोणतीही गोष्ट कायम अथवा सनातन नाही. प्रत्येक गोष्ट परिवर्तनशील (बदलास पात्र) आहे. अस्तित्व हे नेहमीच घडत असते. किंबहुना परिवर्तनशीलता हाच जगाचा नियम होय.

२४. युद्ध जर सत्यासाठी व न्यायासाठी नसेल तर ते घातक आहे.

२५. विजेत्याची जितांबाबत काही कर्तव्ये आहेत.

संक्षिप्त स्वरूपात बुद्धाची तत्त्वे ही आहेत फार प्राचीन काळात जरी सांगितलेली असली तरीही आजही ती तितकीच नवीन वाटतात. (किती प्राचीन, पण किती नवीन) !

## २. कार्ल मार्क्सचा सिद्धांत

आता आपण कार्ल मार्क्सने मुळात प्रतिपादन केल्याच्या तत्त्वांचे विवेचन करू (त्याच्या तत्त्वांकडे वळूया). कार्ल मार्क्स हा आधुनिक समाजवादाचा अथवा साम्यवादाचा जनक आहे यात शंका नाही. परंतु केवळ समाजवादाचा सिद्धांत प्रतिपादन करण्यात त्याला स्वारस्य नव्हते. ती गोष्ट त्याच्याही फार पूर्वी इतरांनी केली होती. मार्क्सला त्याचा समाजवाद वैज्ञानिक होता हे सिद्ध करण्यात अधिक स्वारस्य होते. त्याची चळवळ भांडवलदारांविरूद्ध जशी होती तशीच ती ज्यांना त्याने स्वप्नरंजित किंवा अव्यावहारिक समाजवादी म्हटले त्यांच्याविरूद्धही होती. आपला समाजवादाचा प्रकार हा वैज्ञानिक असून स्वप्नरंजित नाही, हे आपले म्हणणे प्रस्थापित करणे, यापेक्षा मार्क्सने प्रतिपादन केलेल्या सर्व सिद्धांतांचा अन्य कोणताही हेतू नव्हता.

'वैज्ञानिक समाजवाद' द्वारे कार्ल मार्क्सला जे अभिप्रेत होते ते हे की, त्याचा समाजवादाचा प्रकार हा अटळ आणि अपरिहार्य आहे आणि समाज त्या दिशेने मार्गक्रमण करीत आहे व त्याचा मार्ग कोणीही रोखू शकत नाही. आपले हे नवे आणि विचारसरणी (म्हणणे) सिद्ध करण्यासाठी मार्क्सने विशेषतः (कष्ट घेतले) परिश्रम केलेले आहेत.

मार्क्सची विचारसरणी (म्हणणे) पुढील सिद्धांतांवर आधारलेली आहे ती अशी -

१. तत्त्वज्ञानाचा हेतू (जगाची पुनर्रचना करणे हा असून) विश्वाचे उगमस्थान काय याचे स्पष्टीकरण करणे हे नसून विश्वाचे पुननिर्माण करणे हा आहे.

२. आर्थिक शक्ती हीच मुख्यतः इतिहास घडविण्यात जबाबदार असतात.

३. समाजाची मालक व कामगार या दोन वर्गांमध्ये विभागणी झालेली आहे.

४. या दोन वर्गांमध्ये नेहमीच वर्गकलह (चालू आहे) सुरू असतो.

५. मालक वर्गाद्वारे मजूर वर्गाचे नेहमीच शोषण होत असते. कामगारांच्या श्रमाचे फळ असलेल्या नफ्यांचे (Profit) अथवा 'अतिरिक्त मुल्याचा' मालक वर्गाद्वारे दुरूपयोग होत असतो.

६. ही पिवळणूक उत्पादनसाधनांचे राष्ट्रीयीकरण करून म्हणजे (खाजगी) व्यक्तिगत संपत्ति नष्ट करून (संपुष्टात आणता येईल), नष्ट करता येईल.

७. मालक वर्गाद्वारे मजूर वर्गाची पिळवणूक हीच श्रमिक वर्गाला अधिकाधिक दुर्बल आणि दारिद्र्य बनवित आहे.

८. कामगारांमधील ह्या वाढती दुर्बलता आणि दारिद्र्याचा परिणाम म्हणून कामगारांमध्ये क्रांतिकारी भावना निर्माण होत आहे आणि त्यामुळे वर्गकलहाचे रूपांतर वर्गलढ्यात होत आहे.

९. कामगार हे मालकापेक्षा संख्येने जास्त असल्यामुळे ते राज्यसत्ता हस्तगत करतील व स्वतःचे राज्य प्रस्थापित करतील हे अटळ आहे. (यालाच त्याने कामगारवर्गाची हुकूमशाही असे म्हटले आहे.)

१०. या क्रांतीला कुणीही रोखू शकत नाही त्यामुळेच समाजवाद हा अटळ आहे.

मला आशा आहे की मार्क्सच्या समाजवादाची मूलभुत विचारसरणी मी अचूकपणे मांडलेली आहे.

## ३. मार्क्सवादी सिद्धांतातील टिकावूपणा

बुद्ध आणि काल मार्क्स यांच्या तत्त्वज्ञानांची तुलना करण्यापूर्वी ह्या मार्क्सवादी तत्त्वांच्या मूळ लिखाणातील कितीसे टिकून राहिले, इतिहासाने किती बाद ठरवले व त्याच्या विरोधकांनी किती नष्ट केले याची नोंद घेणे आवश्यक आहे.

मार्क्सवादी तत्त्वज्ञान, ज्यावेळी एकोणिसाव्या शतकाच्या मध्यकालात मांडण्यात आले होते, तेव्हापासूनच त्याच्यावर पुष्कळ टीका होत आलेली आहे. या टीकेचे पर्यवसान कार्ल मार्क्सने उभारलेल्या तत्त्वज्ञानाच्या स्वरूपाचे तुकडे पडण्यात झाले आहे. समाजवाद हा अटळ आहे हा मार्क्सवादी दावा पूर्णपणे फोल ठरला आहे. यात शंका घेण्यास क्वचितच एखादी जागा असू शकेल. समाजवादाचे बायबल असलेल्या त्याच्या **"दास कॅपिटल"** चे प्रकाशन झाल्यानंतर साधारणतः सत्तर (७०) वर्षांच्या कालावधीनंतर 1917 मध्ये एका देशात (रशियात) कामगारवर्गाची हुकूमशाही प्रथम प्रस्थापित झाली. साम्यवाद - (जे कामगारवर्गाच्या हुकूमशाहीचे दुसरे नाव आहे -

जेव्हा रशियात आला तेव्हा देखील तो कोणत्याही प्रकारच्या मानवी प्रयत्नाशिवाय काहीतरी अटल बाब म्हणून आला नाही; त्याच्यासाठी क्रांती झाली) साम्यवाद रशियात प्रत्यक्षात आणण्यासाठी (पाऊल टाकण्याची शक्यता निर्माण होण्यापूर्वी) पुष्कळच हिंसा व रक्तपात घडवून आणावा ह्याकरिता जाणीवपूर्वक योजना आखावी लागली. साम्यवाद ज्याला कामगार वर्गाची हुकूमशाही म्हणतात. तो रशियात सहजासहजी आलेला नाही तर त्याला देखील मानवी प्रयत्न करावेच लागले अर्थात् क्रांती करावी लागली. रशियाने उर्वरित जगातील देशात आजही साम्यवाद प्रत्यक्षात अस्तित्वात आणण्याची दिवास्वप्ने बघितली. 'समाजवाद अटळ आहे' हा मार्क्सवादी सिद्धांत सर्वसाधारणपणे फोल ठरला आहे. त्याशिवाय या यादीत सांगितलेली इतर विधाने देखील तर्काने तसेच अनुभवाच्या आधारावर नष्ट करण्यात आली आहेत. इतिहास घडण्यास कारण म्हणून आता कोणीही (इतिहासाचे) आर्थिक स्पष्टीकरण स्वीकारत नाही. कामगारांना वाढत्या प्रमाणात भिकेस लावले गेलै आहे हे कोणीही मान्य करीत नाही. हीच गोष्ट त्याच्या इतर आधारविधानांना लागू आहे.

कार्ल मार्क्सचे विचारसरणीतील जे काही अवशेष समान शिल्लक राहतात ते आहेत अवशेष, लहान तरीही अत्यंत महत्त्वाची आहेत. माझ्या मते या अवशेषामध्ये पुढील चार बाबींचा अंतर्भाव होतो :

१. तत्त्वज्ञानाचे कार्य जगाची पुनर्रचना करणे आहे, विश्वाच्या उगमस्थानाचे स्पष्टीकरण करण्यात वेळ नष्ट करणे नव्हे.

२. वर्गावर्गामध्ये हितसंबंधांचा कलह आहे.

३. संपत्तीच्या खाजगी मालकीमुळे एका वर्गाला सत्ता मिळते तर दुसऱ्या वर्गाला त्याची पिळवणूक झाल्यामुळे दुःख मिळते.

४. समाजाच्या भल्यासाठी खाजगी संपत्ती नष्ट करून हे दुःख दूर करणे आवश्यक आहे.

## ४. बुद्ध व कार्ल मार्क्स यांच्यामधील तुलना

मार्क्सवादी सिद्धांतातून जी तत्त्वे टिकून राहिली आहेत ते घेऊन आता आपणास बुद्ध व कार्ल मार्क्स यांच्यामध्ये तुलना करता येईल.

पहिल्या मुद्यावर बुद्ध व कार्ल मार्क्स यांच्यामध्ये पूर्ण एकमत आहे.

हे एकमत किती घनिष्ठ आहे हे दर्शविण्यासाठी मी बुद्ध आणि पोट्ठपाद ब्राह्मण यांच्यामध्ये झालेल्या संवादातील काही भाग खाली देत आहे.

''त्यानंतर पोट्ठपादाने पुढील शब्दात (बुद्धाला) प्रश्न विचारले :

१. जग नित्य नाही काय?

२. जगाला अंत आहे काय?

३. जग अनंत आहे काय?

४. चेतना (जीव) ही शरीरासारखीच आहे काय?

५. चेतना ही एक गोष्ट व शरीर ही दुसरी गोष्ट आहे काय?

६. ज्याला सत्य प्राप्त झाले आहे तो (तथागत) मरणोत्तर जिवंत राहतो काय?

७. तो मरणोत्तर पुन्हा जिवंत रहातही नाही किंवा जिवंत रहात नाही असेही नाही, असे आहे काय?

आणि मग या प्रत्येक प्रश्नाला भगवंतांनी एकाच प्रकारचे उत्तर दिले आहे ते असे - ''पोट्ठपाद, या बाबतीत मी माझे कोणतेही मत व्यक्त केलेले नाही.''

२८. **''परंतु भगवंतांनी त्यावर कोणतेही मत का व्यक्त केलेले नाही.''**

(कारण) या प्रश्नाच्या उत्तरापासून काहीच लाभ नाही, त्याचा धम्माशी संबंध नाही ते सदाचरणाच्या कोणत्याही तत्त्वांची वृद्धी करीत नाही, किंवा त्यापासून अनासक्ति, लोभापासून हृदयाची मुक्ती किंवा शांती दमन किंवा अभिज्ञान (अष्टांग मार्गाच्या उच्चतर अवस्थांचे ज्ञान) किंवा निर्वाण साध्य होत नाही, म्हणून मी आपले मत व्यक्त केलेले नाही.''

दुसऱ्या मुद्याबाबत, बुद्ध व कोसलचा राजा प्रसेनजित यांच्यामध्ये झालेल्या संवादातील भाग मी खाली देत आहे?

''आणखी असे की, राजाराजांमध्ये, सरदारासरदारांमध्ये ब्राह्मणाब्रह्मणांमध्ये, गृहस्थागृहस्थांमध्ये, माता व पुत्रामध्ये, पुत्र व पित्यामध्ये, बंधुभगिनींमध्ये, मित्रामित्रांमध्ये नेहमी कलह चालू आहे.'' **जरी हे शब्द प्रसेनजिताचे असले तरी त्यातून त्याने समाजाचे खरे चित्र उभे केल्याचे बुद्धाने नाकारलेले नाही.**

वर्गकलहाबाबतचा बुद्धाचा स्वतःचा दृष्टिकोन विचारात घेता, त्याचा अष्टांग मार्गाचा सिद्धांत हा 'वर्ग-कलह अस्तित्वात आहे वा हा वर्गकलह हेच दुःखाचे कारण आहे,' यास मान्यता देतो.

तिसऱ्या प्रश्नाबाबत मी पोट्ठपादाबरोबर झालेल्या बुद्धाचा त्याच संवादातील भाग उद्धृत करतो?

''मग भगवंतांनी काय सांगितले?''

पोट्ठपाद, मी दुःख अस्तित्वात आहे हे सांगितले ! मी दुःखाचे मुळ काय आहे, हे सांगितले. मी दुःखाचा अंत कसा होऊ शकतो ते सांगितले, मी कोणत्या मार्गाने दुःखाचा अंत घडवता येईल, ते सांगितले.''

३०. ''आणि भगवंतांनी याप्रमाणे का सांगितले?''

''कारण पोट्ठपाद, हे विधान लाभदायक आहे. ते धम्माशी संबंधित आहे. ते सम्यक् आचरणाचा प्रारंभ, वैराग्य, लोभापासून मुक्ती, शांती, दमन, अभिज्ञान ऊर्फ जीवनातील उच्चतर अवस्थांची दृष्टी (संबोधि) व निर्वाण यांना कारणीभूत होते. म्हणून पोट्ठपाद, मी त्याप्रमाणे विधान केले आहे.''

भाषा वेगळी आहे, परंतु अर्थ तोच आहे. जर दुःखाचा अर्थ 'पिळवणूक' असा घेतला तर बुद्ध व मार्क्स यांमध्ये अंतर नाही.

खाजगी संपत्तीच्या प्रश्नावर बुद्ध आणि आनंद यांच्यात झालेल्या संवादातील पुढील उतारा उद्बोधक आहे. आनंदाच्या प्रश्नाला उत्तर देताना बुद्ध म्हणतो,

''धन लालसा 'हाव' असण्याचे कारण 'मालकी' असे मी सांगितले आहे. तर, ते तसे कोणत्या प्रकारे सांगितले, ते आनंद, या पद्धतीने समजून घेता येईल.''

''जे कोणत्याही तऱ्हेची किंवा कोणत्याही प्रकारची मालकी नसेल- मग ती कोणाचीही असो वा कोणत्याही गोष्टीची असो-तेथे कोणतीही मालकी नसल्यामुळे, तेथे मालकीच्या अशा नसण्यामुळे कोणत्याही प्रकारची धन लोभ (हाव) दिसून येईल काय?

''दिसून येणार नाही, भगवन् !''

''म्हणून, आनंद, हेच त्याचे कारण, आधार व उत्पत्ती आहे. लोभ (हाव) असण्याचे कारण मालकी.''

३१. ''मी आसक्ती हे मालकी असण्याचे कारण सांगितले आहे. तर आनंद, ती तशी कोणत्या प्रकारे आहे या पद्धतीने समजून घ्यावे लागेल. जेथे कोणत्याही तऱ्हेची किंवा कोणत्याही प्रकारची आसक्ती नाही–मग ती कोणी कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत दाखविलेली असो–ती जी काही असेल त्या आसक्तीच्या नसण्याने, कोणत्याही प्रकारची मालकी दिसून येईल काय?''

''दिसून येणार नाही, भगवन् !''

'म्हणून आनंदा, हे त्याचे कारण, आधार व उत्पत्ती आहे.' मालकीचे कारण आसक्ती.'

चौथ्या मुद्यासाठी कोणत्याही पुराव्याची गरज नाही. भिक्षुसंघाचे नियमच यांचे उत्तम प्रमाण आहेत.

या नियमांनुसार भिक्षू केवळ पुढील आठ वस्तूंपुरतीच खाजगी संपत्ती जवळ बाळगू शकतो, त्यापेक्षा अधिक नाही. या आठ वस्तू म्हणजे :

१. रोजच्या वापरासाठी तीन वस्त्रे (चीवर)

२. कमरबंध

३. एक भिक्षापात्र

४. एक वस्तरा

५. एक सुई

६. धागा

७. एक पाणी गाळण्याचे फडके

दुसरी गोष्ट, भिक्षू त्याला जवळ बांळगण्यास परवानगी दिलेल्या आठ वस्तूंशिवाय सोन्याने वा चांदीने आणखी काही वस्तू विकत घेईल या भीतीपोटी सोने किंवा चांदी घेण्यास भिक्षूला पूर्णपणे मनाई होती.

हे नियम रशियातील साम्यवादात दिसून येणाऱ्या नियमांपेक्षा कितीतरी अधिक कठोर आहेत.

## ५. साधने

आता आपण साधनांचा विचार करूया. बुद्धाने प्रतिपादन केलेली साम्यवाद घडवून आणणारी साधने अत्यंत निश्चित अशी (स्पष्ट) होती. ही साधने तीन भागांमध्ये वर्णन करता येऊन शकतील.

भाग एक यामध्ये पंचशीलाच्या आचरणाचा समावेश होतो. बुद्धाने एका नव्या धर्मतत्त्वाला (गॉस्पेल) जन्म दिला. त्याला जो प्रश्न सतावत होता त्या प्रश्नाच्या उत्तराची किल्ली त्या धर्मतत्त्वात (गॉस्पेल) होती.

जग दुःखाने व दैन्याने भरलेले आहे, हे सत्य या नव्या धर्मतत्त्वाचा पाया आहे. हे सत्य केवळ दखल घेण्यापुरते नाही, तर मुक्तीच्या कोणत्याही उपाययोजनेत ते पहिले व सर्वप्रथम मानणे आवश्यक आहे. ही वस्तुस्थिती जाणून घेणे हा बुद्धाने त्याच्या धर्मतत्त्वाचा प्रारंभबिंदू मानला.

ते धर्मतत्त्व कोणत्याही उपयुक्त प्रयोजनार्थ उपयोगी ठरण्यासाठी हे दुःख व दैन्य दूर करणे हे त्याचे ध्येय व उद्दिष्ट होते.

या दुःखाची कारणे कोणती असू शकतील याची चौकशी करता बुद्धाला ती केवळ दोन कारणे असतील असे दिसून आले. माणसाचे दुःख व दैन्य काही अंशी त्याच्या स्वतःच्या दुराचरणाचा (गैरवर्तणुकीचा) परिणाम असतो. दुःखाचे हे कारण दूर करण्यासाठी त्याने पंचशील आचरणात आणण्याचा उपदेश केला. पंचशीलामध्ये पुढील (नियमांच्या) तत्व पालनाचा अंतर्भाव होतो.

१. कोणत्याही प्राणिमात्राला ठार करण्यापासून वा ठार करण्यास कारण ठरण्यापासून अलिप्त राहणे,
२. चोरीपासून म्हणजे दुसऱ्याची मालमत्ता लबाडीने किंवा बळजबरीने संपादन करण्यापासून अलिप्त राहणे,
३. असत्य भाषणापासून अलिप्त राहणे,
४. कामवासनेपासून अलिप्त राहणे,
५. मादक पेयांपासून अलिप्त राहणे.

जगातील दुःख व दैन्य यांचा काही भाग, बुद्धाच्या मते, माणसाच्या माणसाबाबत असलेल्या असमानतेचा परिणाम होय. ही असमानता कशी दूर करता येईल? माणसाची माणसाबाबत असलेली असमानता दूर

करण्यासाठी बुद्धाने आर्य अष्टांगिक मार्ग सांगितला. आर्य अष्टांगिक मार्गाची तत्त्वे अशी आहेत.

१. सम्यक् दृष्टी, म्हणजे अंधश्रद्धांपासून मुक्ती;

२. सम्यक् संकल्प, म्हणजे बुद्धिमान व निश्चयी माणसाला साजेसा उच्च संकल्प;

३. साम्यक् वाचा, म्हणजे करूणेची, मुक्त व सत्यपूर्ण वाचा;

४. सम्यक् व्यायाम, म्हणजे इतर सर्व सात तत्त्वांचे पालन;

५. सम्यक् आजीव, म्हणजे प्राणिमात्राला दुखापत किंवा इजा न करणारी उपजीविका;

६. सम्यक् कर्मांत, म्हणजे इतर सर्व सात तत्त्वांचे पालन;

७. सम्यक् स्मृति, म्हणजे जागृत व कृतिशील मनाने ठेवलेली स्मृती;

८. सम्यक् समाधि, म्हणजे जीवनातील गहन गूढ तत्त्वांवरील गंभीर विचार. पृथ्वीवर न्यायाचे साम्राज्य प्रस्थापित करणे व त्याद्वारे जगाच्या पाठीवरून दुःखाला व दैन्याला हद्दपार करणे हे आर्य अष्टांगिक मार्गाचे ध्येय होय.

काहीतरी उपयोग होऊ शकेल या विचारापासून मुक्त झाल्याशिवाय कोणतेही सत्संकल्प केले तरी-मग ते कितीही ठाम असोत-त्यांच्यापासून त्याला कसलाच लाभ होणार नाही.

या अडथळ्यांवर मात केली तरच माणसाने उत्तम प्रकारे कार्यारंभ केला आहे व त्याला लवकरच किंवा उशीरा का होईना विजय प्राप्त होण्याची शक्यता आहे, असे म्हणता येऊ शकेल. चौथ्या अडथळ्यात शारीरिक वासनांचा (कामतृष्णा) समावेश होतो.

पाचवा अडथळा इतर व्यक्तींबाबतची दुष्ट भावना (क्रोध) हा आहे.

सहावा अडथळा भौतिक आसक्तिपासून असलेल्या भावी प्राप्ती करण्यासाठी सुखाचा लाभ हो.

सातवा अडथळा अरूप देवलोक - प्राप्तीची इच्छा (अरूपराग) हा आहे. आठवा अडथळा अहंकार (मान) आहे व

नववा अडथळा (दंभ) होय.

या अशा भावना आहेत की माणसांना त्यांवर मात करणे सर्वात कठीण आहे व अधिक श्रेष्ठ व्यक्तींना स्वतःपेक्षा जे कमी समर्थ आहेत व कमी चारित्र्यवान आहेत. त्यांच्याप्रति तिरस्कार वाटण्याच्या भावनेवर विजय मिळविणे आणखीच कठीण असते.

दहावा अडथळा 'अज्ञान (अविज्ज)' होय. जरी सर्व अडथळ्यावर मात केली तरी हा एक अडथळा उरेलच. सुज्ञ व सद्‌गुणी माणसाला सलणारा तो काटा आहे. तो माणसाचा अंतिम व कट्टर शत्रू आहे.

आर्य अष्टांगिक मार्गाचे अनुसरण करताना निब्बाणाद्वारे अडथळ्यांवर मात करणे अभिप्रेत आहे.

माणसाने मनाची कोणती अवस्था चिकाटीने विकसित करावी हे आर्य अष्टांगिक मार्गाचा सिद्धांत सांगतो. माणसाला जर आर्य अष्टांगिक मार्गावर चालावयाचे असेल तर त्याने कोणत्या मोहावर व अडथळ्यावर मनःपूर्वक मात केली पाहिजे ते निब्बाण सांगते.

या नव्या धर्मतत्त्वाचा (गॉस्पेलचा) चौथा भाग पारमितांचा सिद्धांत हा आहे.

पारमितांचा सिद्धांत माणसाच्या दैनंदिन जीवनात दहा सद्‌गुणांचे आचरण मनावर ठसवतो. ते दहा सद्‌गुण असे आहेत – १. प्रज्ञा २. शील ३. नैष्कर्म्य ४. दान ५. वीर्य ६. सत्य ७. अधिष्ठान ८. मैत्री आणि ९. उपेक्षा.

अविद्या, मोह किंवा ज्ञानाचा अभाव यांचा अंधःकार दूर करणारा प्रकाश म्हणजे प्रज्ञा अथवा शहाणपण होय. आपल्यापेक्षा सुज्ञ असलेल्यानां प्रश्न विचारून आपल्या सर्व शंका दूर केल्या पाहिजेत, सुज्ञांची संगत केली पाहिजे व मनाचा विकास करण्यास मदत करतील अशा वेगवेगळ्या कला व शास्त्रे जोपासली पाहिजेत. या गोष्टी प्रज्ञेसाठी आवश्यक आहेत.

शील ही नैतिक भावना आहे. वाईट गोष्टी न करण्याचा व चांगल्या गोष्टी करण्याचा, चूक करण्याची लाज वाटण्याचा असा तो स्वभाव आहे. शिक्षेच्या भीतीने वाईट करण्याचे टाळणे म्हणजे शील. शीलाचा अर्थ पापाचरण करण्याची भीती. नैष्कर्म्य म्हणजे ऐहिक सुखांचा त्याग.

दान याचा अर्थ, इतरांच्या भल्यासाठी, त्या बदल्यात कोणत्याही गोष्टीची अपेक्षा करता, एखाद्याने आपली मालमत्ता, रक्त, अवयव व आपले प्राणदेखील अर्पण करणे होय.

वीर्य म्हणजे साम्यक् प्रयत्न. मागे न फिरण्याच्या विचाराने आपण जी काही गोष्ट करण्यासाठी हाती घेतली असेल ती आपली सर्व शक्ती एकवटून पार पाडणे होय.

शांती म्हणजे सहनशीलता होय द्वेषाला उत्तर न देणे हे तिचे सार आहे. कारण द्वेषाने द्वेष शम्पत नाही, तो केवळ सहनशीलतेने शमतो.

सत्य म्हणजे खरे बोलणे कधीही खोट न बोलण्याची सत्य ही बुद्धाची एक उत्कट इच्छा होय. त्याचे बोलणे सत्य असते व ते अन्य काही नसून केवळ सत्य असते.

अधिष्ठान म्हणजे ध्येयापर्वंत पोहोचण्यासाठी केलेला ठाम निर्धार होय.

मैत्री ही शत्रू व मित्र, प्राणी व मनुष्य अशा सर्व प्राण्यांना सामावणारी मैत्रीची भावना होय.

'उपेक्षा' ही उदासीनतेहून भिन्न अशी अलिप्तता होय. ही मनाची एक अवस्था आहे. त्या अवस्थेत कोणतीही आवड किंवा नावड नसते. परिणामाने विचलित न होता त्याचा पाठपुरावा करीत राहण्याची ती अवस्था होय.

हे सद्गुण आपण पराकाष्ठेने आपल्या आचरणात आणले पाहिजेत. म्हणूनच त्यांना पारमिता (पूर्णतेच्या अवस्था) असे म्हणतात.

जगातील दुःख व दैन्य संपुष्टात आणण्यासाठी बुद्धाने त्याच्या संबोधीची फलश्रुती म्हणून अधिकारवाणीने प्रतिपादन केलेला हा धम्मोप्रदेश आहे. बुद्धाने स्वीकारलेली साधने ही माणसाने (स्वच्छेने) प्रज्ञा व शील याचा सन्मार्ग अनुसरून आपला नैतिक आचरण बदलावा व मतान्तर घडवून आणावे यासाठी होती, हे स्पष्ट आहे.

साम्यवाद्यांनी स्वीकारलेली साधने तितकीच स्पष्ट, अपुरी व झटपट अंमलात येणारी आहेत, ती म्हणजे १. हिंसा आणि २. कामगारांची हुकूमशाही.

साम्यवाद प्रस्थापित करण्याची केवळ हीच दोन साधने आहेत असे साम्यवादी म्हणतात. पहिले साधन हिंसा आहे. विद्यमान पद्धती मोडून टाकण्यासाठी त्याशिवाय दुसरी कोणतीही गोष्ट पर्याप्त ठरणार नाही. दुसरे साधन, कामगारांची हुकूमशाही आहे. साम्यवादी (नवीन) आणण्यासाठी त्याशिवाय दुसरी कोणतीही गोष्ट पर्याप्त ठरणार नाही.

बुद्ध व कार्ल मार्क्स यांच्यामधील साम्य व भेद आता स्पष्ट झालेले आहे. दोघांचे ध्येय समान आहे. भेद मात्र साधनाबाबत आहेत.

## ६. साधनांचे मूल्यमापन

आपण आता साधनांच्या मूल्यमापनाकडे वळूया. कोणाची साधने श्रेष्ठ असून ती साधने दीर्घकाळ टिकून राहतील, हे आपण विचारात घेतले पाहिजे. तथापि, दोन्ही बाजूस काही गैरसमज आहेत. ते काढून टाकणे आवश्यक आहे.

हिंसेचा मुद्दा घ्या. हिंसेच्या केवळ कल्पनेने ज्यांचा थरकाप उडतो असे अनेक लोक आहेत. परंतु ही केवळ एक भावना आहे. एकंदरीत पाहता हिंसेवाचून चालू शकणार नाही. बिगर-साम्यवादी देशांमध्ये देखील खुन्याला फाशी देण्यात येते. फाशी देणे हे हिंसा करण्यासारखे नाही काय? बिगर-साम्यवादी देश बिगर-साम्यवादी देशाबरोबर युद्ध करतात. लाखो लोक ठार केले जातात. ही हिंसा नाही काय? जर एखाद्या संपत्तीच्या मालकाला, जर त्याची मालकी बाकीच्या लोकांना दुःखात लोटत असेल तर, का ठार करण्यात येऊ नये? संपत्तीच्या मालकाचा अपवाद करण्याचे कोणतेही कारण नाही., खाजगी संपत्ती पवित्र म्हणून कोणी का मानावी?

बुद्ध हिंसेच्या विरूद्ध होता परंतु तो न्यायाच्याही बाजूला होता. जेथे न्यायासाठी आवश्यक असेल तेथे त्याने बळाचा वापर करण्यास परवानगी दिली होती. ही गोष्ट वैशालीचा मुख्य सेनापती असलेल्या सिंह सेनापतीशी झालेल्या त्याच्या संवादातून उत्तमरीत्या दर्शविली गेली आहे. बुद्ध अहिंसेचा उपदेश करीत असल्याचे समजल्यावरून सिंह सेनापती त्याच्याकडे गेला व त्याने असे विचारले.

'भगवान अहिंसेचा उपदेश करतात. याचा अर्थ भगवान अपराध्याला शासन करू नये असा उपदेश करतात काय? आमच्या बायका-मुलांचे व आमच्या संपत्तीचे रक्षण करण्यासाठी आम्ही युद्धावर जाऊ नये, असा उपदेश भगवान करतात काय? अहिंसेच्या नावाखाली आम्ही गुन्हेगारांच्या हातून सोसावी हानी काय? युद्ध सत्याच्या व न्यायाच्या हिताचे असले तरी तथागत सर्व प्रकारच्या युद्धाला प्रतिबंध करतात काय?

बुद्धाने उत्तर दिले, ''मी जो काही उपदेश करीत आहे त्याचा तू

चुकीचा अर्थ घेतला आहेस. अपराध्याला शिक्षा झालीच पाहिजे व निरपराधी माणसाची सुटकादेखील झाली पाहिजे. न्यायाधीशाने जर एखाद्या गुन्हेगाराला शिक्षा दिली तर तो न्यायाधीशाचा गुन्हा नाही. तेथे शिक्षेचे कारण म्हणजे गुन्हेगाराचा गुन्हा आहे. शिक्षा सुनावणारा न्यायाधीश केवळ कायद्याची अंमलबजावणी करीत असतो. त्याला अहिंसा न पाळल्याचा आरोप करता येऊ शकत नाही. जेव्हा शांतता राखण्याचे सर्व उपाय अयशस्वी ठरतात तेव्हा होणाऱ्या हिंसेची जबाबदारी जो युद्ध सुरू करता त्याच्यावर येऊन पडते. दुष्ट शक्तींना कोणी कधीच शरण जाता कामा नये. युद्ध असू शकेल, पण ते स्वार्थी हेतूंसाठी असता कामा नये.

प्रा. जॉन ड्युई यांनी आवर्जून मांडलेल्या करणांसारखीच हिंसेच्या विरोधात अर्थात इतरही कारणे आहेत. जे असे सांगता की, साध्य हे साधनांना योग्य ठरवते हे नैतिकदृष्ट्या विकृत तत्त्व आहे, त्यांचा समाचार घेताना ड्युईंनी योग्यच विचारले आहे की, साध्य जर साधनांना योग्य ठरवू शकणार नसेल तर कोण योग्य ठरवू शकेल? केवळ साध्यच असे असू शकते की साधनांना योग्य ठरवू शकते.

साध्यच केवळ साधनांना योग्य ठरवू शकते, यास बहुधा बुद्धाने मान्यता दिली असती. दुसरी कोणती शक्यता होती? आणि जर साध्याने हिंसा ही योग्य ठरविली असेल तर नजरेसमोरचे 'साध्य' साध्य करण्यासाठी हिंसा ही न्याय्य साधन असेल, असे तो म्हणाला असता. जर बळ हे त्या साध्यासाठी एकमेव साधन असते तर संपत्तीच्या मालकांना बळाच्या वापरातून त्याने निश्चितच वगळले नसते. अशा प्रकारे साध्यासाठी असलेली त्याची साधने ही वेगळी होती असे आपणास दिसून येईल. प्रा. ड्युई यांनी दर्शविल्याप्रमाणे, हिंसा हे केवळ बळाचा वापर करण्याचे दुसरे नाव आहे. आणि जरी हिंसा ही सृजनात्मक प्रयोगनासाठी वापरणे आवश्यक असले तरी ऊर्जा म्हणून बळाचा वापर आणि हिंसा म्हणून बळाचा वापर यामध्ये भेद हा केलाच पाहिजे. एक साध्य प्राप्त करताना जी गोष्ट नष्ट करावयाचे योजले असेल तिच्या बरोबर असलेल्या इतर अनेक साध्यांचाही नाश अंतर्भूत असतो. बळाचा वापर अशा प्रकारे नियंत्रित असला पाहिजे की एक वाईट गोष्ट नष्ट करताना शक्य होतील तितकी इतर अनेक साध्ये वाचवली जावीत. बुद्धाची अहिंसा ही जैन धर्माचा संस्थापक महावीर त्याने उपदेशिलेल्या अहिंसेसारखी टोकाची नव्हती. त्याने फक्त ऊर्जा म्हणून करण्यात येणाऱ्या बळाच्या वापराला परवानगी दिली असती. अहिंसा हे अनिर्बंध तत्त्व आहे

असा प्रचार साम्यवादी करतात. बुद्धाचा त्यास सक्त विरोध होता.

हुकुमशाहीच्या बाबतीत सांगावयाचे तर बुद्धाला कसलीच हुकूमशाही मान्य झाली नासती. तो प्रजासत्ताकवादी म्हणून जन्माला आला व प्रजासत्ताकवादी म्हणूनच पावला. त्याच्या जीवनकाळात १४ राजसत्ताक राज्ये व ४ प्रजासत्ताकवादी राज्ये होती. तो शाक्यांपैकी होता आणि शक्यांचे राज्य प्रजासत्ताक होते. वैशाली हे त्याचे दुसरे घर होते, ते प्रजासत्ताक असल्यामुळे त्याला वैशालीबद्दल अत्यंत प्रेम वाटप असे. महापरिनिर्वाणाआधीच त्याचा वर्षावास त्याने वैशालीत घालवला. हा वर्षावास पूर्ण झाल्यावर त्याने त्याच्या इच्छेनुसार वैशाली सोडण्याचे व अन्यत्र जाण्याचे ठरविले. काही अंतर चालून गेल्यावर त्याने वैशालीकडे मागे वळून पाहिले व आनंदाला म्हणाला, ‘‘तथागताला वैशालीचे हे अखेरचे दर्शन आहे.’’ इतके त्याला या प्रजासत्ताकाबद्दल प्रेम वाटप होते. तो पूर्णपणे समातावादी होता. सुरूवातीला भिक्षू, स्वतः बुद्धदेखील, चिंध्यांपासून बनविलेली वस्त्रे वापरीत. सरंजामदारी वर्गाला संघात सामील होण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी हा नियम घालून देण्यात आला होता. पुढे महाभिषकू जीवकाने संपूर्ण कापडापासून बनविलेले एक वस्त्र बुद्धाला (प्रेमाने) स्वीकारायला लावले. बुद्धाने तत्काळ नियम बदलला व तो सर्व भिक्षूंनाही लागू केला.

भिक्षूणीसंघात सामीला झालेली बुद्धाची माता प्रजापती गौतमी हिने एकदा बुद्धाला थंडीची बाधा झाल्याचे ऐकले. तिने लगेच त्याच्यासाठी एक लोकरी पट्टा विणायला सुरूवात केली. तो विणून झाल्यावर ती तो बुद्धाकडे घेऊन गेली व तिने त्याला तो घालण्याची विनंती केली. परंतु जर ते दान असेल तर ते सर्व संघाला दिलेले दान असले पाहिजे, ते संघाच्या कुणा व्यक्तिगत सदस्यासाठी असता कामा नये, असे म्हणून त्याने तो स्वीकारण्यास नकार दिला. तिने पुनःपुन्हा विनवणी केली, परंतु त्याने तो घेण्यास नकार दिला.

भिक्षुसंघाची रचना अत्यंत समतावादी होती. बुद्ध स्वतः केवळ भिक्षूंपैकी एक होता. तसेच तो संसदेच्या सदस्यांमध्ये पंतप्रधानासारखा होता. तो कधीच हुकूमशहा नव्हता. संघावर नियंत्रण ठेवण्यासाठी संघाचा प्रमुख म्हणून कोणाला तरी नेमावे अशी त्याच्या मृत्युपूर्वी त्याला दोनदा विनंती करण्यात आली होती. परंतु त्याने हुकूमशहा होण्यास नकार दिला व हुकूमशहा नेमण्यासही नकार दिला.

**साधनांच्या मूल्याविषयी काय? कोणाची साधने श्रेष्ठ आहेत व चिरकाल टिकणार आहे?**

साम्यवाद्यांनी त्यांचे मौल्यवान साध्य प्राप्त करताना इतर मौल्यवान साध्यांचा नाश केला नाही असे ते म्हणू शकतात काय? त्यांनी खाजगी मालमत्ता नष्ट केली आहे. हे मौल्यवान साध्य असल्याचे गृहीत धरून ते प्राप्त करण्याच्या प्रक्रियेत साम्यवाद्यांनी इतर मौल्यवान साध्ये नष्ट केलेली नाहीत असे ते म्हणून शकतात काय? त्यांचे साध्य प्राप्त करण्यासाठी त्यांनी कित्येक लोकांना ठार केले. मानवी जीवनाला कोणतेच मोल नाही काय? त्यांना मालकाचा प्राण न घेता मालमत्ता घेता येऊ शकली नसती काय?

आता हुकूमशाहीचा विचार करूया. क्रांती ही कायमची क्रांती बनविणे हे हुकूमशाहीचे साध्य आहे. हे एक मौल्यवान साध्य आहे. परंतु हे प्राप्त करताना त्यांनी इतर मौल्यवान साध्ये नष्ट केली नाहीत असे साम्यवादी म्हणू शकतात काय? स्वतंत्र्यांच्या अभाव अथवा संसदीय शासनाचा अभाव अशी हुकूमशाहीची व्याख्या नेहमी करण्यात येते. दोन्ही अर्थ तितकेसे सुस्पष्ट नाहीत. जेथे संसदीय शासन आहे तेथे देखील स्वातंत्र्य नाही. कारण कायद्याचा अर्थ स्वातंत्र्याचा शासन आहे तेथे देखील स्वातंत्र्य नाही. कारण कायद्याचा अर्थ स्वातंत्र्याचा अभाव असाच आहे. येथे हुकूमशाही व संसदीय शासन यामध्ये फरक आढळतो. संसदीय शासनसंस्थेत प्रत्येक नागरिकाला शासनाने लादलेल्या निर्बंधावर टीका करण्याचा हक्क असतो. संसदीय शासनसंस्थेत तुम्हाला कर्तव्य आहे व हक्क आहे, त्यामुळे कायद्याचे पालन करण्याचे कर्तव्य आणि कायद्यावर टीका करण्याचा हक्क आहे. हुकूमशाहीत केवळ पालन करणे एवढेच कर्तव्य आहे, परंतु तिच्यावर टीका करण्याचा हक्क नाही.

## ७. कोणाची साधने अधिक परिणामकारक व टिकावू आहेत?

आता आपण कोणती साधने आधिक टिकणारी आहेत याचा विचार करूया. बळाने चालणारे शासन आणि नैतिक भावनेने चालणारे शासन यापैकी कुणा एकाची निवड करावी लागले.

बर्कने म्हटल्यानुसार, बळ हे कायमस्वरूपी टिकणारे साधन असू

शकत नाही. अमेरिकेशी समेट करण्यासंदर्भातील त्याच्या भाषणात त्याने ही धोक्याची सूचना दिली आहे.

''महाशय, केवळ बळाचा वापर हा तात्पुरता टिकणारा आहे ही गोष्ट सांगण्यास मला परवानगी असावी. तो (वापर) क्षणभर ताब्यात आणील; पण पुन्हा ताब्यात आणण्याची आवश्यकता तो नाहीशी करत नाही आणि अशा प्रकारे जे राष्ट्र कायमचे जिंकलेले असेल त्या राष्ट्रावर शासन चालत नाही.''

''माझा यापुढील आक्षेप त्याच्या अनिश्चितेबाबत आहे. दहशत ही नेहमीच बळाचा परिणाम असते असे नाही व शस्त्रसज्जता हा विजय असत नाही. तुम्ही जर विजयी झाला नाहीत तर तुम्हाला पर्याय नसेल. कारण, समेट अयशस्वी ठरल्यावर बळाचा वापर करणे एवढाच मार्ग उरतो. परंतु बळाचा वापर अयशस्वी ठरल्यावर त्यापुढे समेटाची कसलीच आशा उरत नाही. सत्ता व अधिकार कधीकधी सदयतेने ठरल्यावर त्यापुढे समेटाची कसलीच आशा उरत नाही. सत्ता व अधिकार कधीकधी सदयतेने मिळतात, परंतु दारूण व पराजित हिंसेकडून त्यांची कधीच भीक मागितली जाऊ शकत नाही.

''बळाविषयी आणखी एक आक्षेप असा आहे की, आपले साध्य टिकवून ठेवण्याच्या बळजबरीच्या हरेक प्रयत्नामुळे आपण आपले साध्य बिघडवून टाकतो. त्यामुळे आपण ज्या गोष्टीसाठी लढतो नि अपयशी ठरलो ती गोष्ट आपण पुन्हा मिळवू शकलो, तरी ती मूल्य हरवलेली, बुडित, स्पर्धेत वाया गेलेली व वापरलेली असते.''

भिक्षूंना दिलेल्या एका प्रवचनात बुद्धाने सदाचरणाचा नियम आणि दंडशक्तीचा म्हणजे विधीचा नियम यांमध्ये फरक दाखविला होता. भिक्षुसंघाला उद्देशून तो म्हणाला होता.

२. फार फार वर्षांपूर्वी, हे बंधूंनो, दृढनेमी नावाचा न्यायाने राज्य करणारा राजा, सार्वभौम अधिपती, विजेता, लोकांचा रक्षणकर्ता, राज्य करीत असलेले एक साम्राज्य होते. तो धर्मचक्रप्रवर्तक होता, या समुद्रवेष्टित पृथ्वीला

या धर्मतत्त्वाचा तिसरा भाग म्हणजे निब्बाणाचा सिद्धांत होय. निब्बणाचा सिद्धांत हा आर्य आष्टांगिक मार्गाच्या अविभाज्य भाग आहे. निब्बाणा शिवाय आर्य आष्टांगिक मार्गाची ओळख पूर्ण होऊ शकत नाही.

अ आष्टांगिक मार्ग ओळखण्याच्या मार्गात कोणत्या अडचणी येतात ते निब्बाचा सिद्धांत सांगतो.

या अडचणीपैकी मुख्य अडचणी दहा आहेत. बुद्धाने त्यांना 'दहा आसव' (आश्रव), बंधने अथवा अडथळे असे म्हटले आहे. पहिला अडथळा स्वतःविषयीचा भ्रम हा आहे. जोपर्यंत माणूस हा पूर्णपणे स्वतःपुरता जगत असेल, जोपर्यंत तो स्वतःच्या अंतकरणातील तीव्र इच्छांचे समाधान करण्याच्या पोकळ कल्पना करून प्रत्येक दिखाऊ वस्तूच्या मागे लागला असेल, तो पर्यंत त्याच्यासाठी कोणताही मार्ग आर्य मार्ग नाही. अमर्याद विश्वाचा तो केवळ एक लहानसा भाग आहे, या वस्तुस्थितीने जेव्हा त्याचे डोळे उघडतील तेव्हाच, त्याचे तात्पुरते व्यक्तित्व ही किती अनित्य गोष्ट आहे, हे तो ओळखू लागेल तेव्हाच, तो सत्याच्या खडतर मार्गावर पाऊल टाकू शकेल.

दुसरा अडथळा शंका व अनिश्चय (विचिकिच्छा ऊर्फ विचिकित्सा) होय. जेव्हा अस्तित्वाच्या महान गूढविषयी, प्रत्येक व्यक्तित्वाच्या अशाश्वततेविषयी माणसाचे डोळे उघडतील तेव्हा शंका व अनिश्चय यांचा त्यांच्या कृतीवर परिणाम (हल्ला) होणे संभवनीय आहे. करावे की करू नये, नाही तरी माझे सर्व व्यक्तित्व हे क्षणभंगुरच आहे, मग एखादी गोष्ट का करावी वा न करावी, अशा प्रश्नांनी त्याला अनिश्चयी व निष्क्रिय बनविले जाते. परंतु जीवनात ते चालणार नाही. गुरूजी शिकवण अनुसरण्यासाठी, सत्य स्वीकारण्यासाठी व लढ्यात उतरण्यासाठी त्याने मनाची तयारी केलीच पाहिजे, नाही तर त्याला याहून अधिक काहीच प्राप्त होणार नाही.

तिसरा अडथळा संस्कार (धर्मविधी) व व्रतवैकल्पे यांच्या कार्यसिद्धीवर अवलंबून राहणे (सीलब्बतपरामास उर्फ शीलव्रतपरामर्श) हा आहे. माणूस धार्मिक विधीचे स्तोम माजवण्यापासून व कोणत्याही बाह्यकृती, कोणतेही पौरोहित्याचे प्रस्थ व पवित्र व्रतवैकल्पे यांचा त्याला पराक्रमाने किंवा तलवारीने नव्हे, तर सदाचाराने जिंकून तो या पृथ्वीवर सम्राट म्हणून जगला.

३. ''मग बंधूंनो, अनेक वर्षांनंतर, सहस्रावधी वर्षांनंतर, दृढनेमी राजाने एका माणसाला अशी आज्ञा केली.

''दिव्यचक्र थोडेसे बुडाले आहे, ते त्याच्या जागेपासून थोडेसे ढळले आहे, असे वाटते; तरी पाहून येऊन मला सांग.''

तेव्हा शेकडो वर्षांनी (दिव्यचक्र) त्याच्या जागेपासून ढळ्ले आहे हे पाहिल्यावर तो माणूस दृढनेमी राजाकडे गेला आणि म्हणाला, 'दिव्यचक्र बुडाले आहे व आपल्या जागेपासून ढळले आहे हे महाराज, खरे आहे.''

''बंधूंनो, दृढनेमी राजाने त्याच्या ज्येष्ठ राजपुत्राला त्यासाठी बोलावले व म्हटले, ''प्रिय मुला, पहा, माझे दिव्यचक्र थोडेसे बुडाले आहे, ते त्याच्या जागेपासून ढळले आहे. मला असे सांगण्यात आले आहे, जर चक्र परावर्तित करणाऱ्या राजाचे दिव्यचक्र बुडाले अथवा ते त्याच्या जागेपासून ढळले तर राजा फार काळ जगणार नाही. मी माझा पूर्ण मानवी ऐहिक आनंद उपभोगला आहे; आता आध्यात्मिक दिव्य आनंद प्राप्त करण्याची वेळ झाली आहे. प्रिय मुला, ये, समुद्रवेष्टित अशा या पृथ्वीचा ताबा घे. मी दाढीमिशी काढून, मुंडन करून आणि काषायवस्त्रे परिधान करून घरातून बेघर अवस्थेत जाता आहे.''

''अशा प्रकारे बंधूंनो, दृढनेमी राजाने त्याच्या थोरल्या मुलास रीतसर गादीवर बसवले व नंतर आपली दाढीमिशी काढून मुंडन केले, काषायवस्त्रे परिधान केली व तो घरातून बेघर अवस्थेत गेला. परंतु तो राजसंन्याशी गेल्यानंतर सातव्या दिवशी ते दिव्यचक्र अदृश्य झाले.

४. मग एक माणूस राजाकडे आला व त्याला म्हणाला : हे राजा, दिव्यचक्र अदृश्य झाले खरे आहे.

हे बंधूंनो, मग तो राजा अतिशय भयव्याकुळ झाला 'व' दुःखी झाला आणि मग तो राजसंन्याशाकडे गेला व त्याला म्हणालाः महाराज हे खरे आहे, दिव्यचक्र अदृश्य झाले आहे !

आणि अभिषिक्त राजाला असे बोलताना पाहून, राजसंन्यशाने त्याला उत्तर दिले, ''प्रिय मुला, दिव्यचक्र अदृश्य झाले म्हणून दुःख करू नको किंवा दिव्यचक्र अदृश्य झाले म्हणून व्यस्थित होऊ नको. दिव्यचक्र, हे प्रिय मुला, पित्याकडून वारशाने मिळत नसते. परंतु प्रिय मुला, चक्रप्रवर्तकांच्या आर्यप्रवर्तनाप्रमाणे (जगाचे खरे सम्राट म्हणून त्यांच्यासमोर मांडलेल्या कर्तव्याच्या उदात्त ध्येयानुसार केलेली कृति) खरोखर तू ते प्रवर्तित कर. मग तू जर धर्मचक्र-प्रवर्तक सम्राटाचे आर्य कर्तव्य पार पाडलेस आणि मुख्य वरिष्ठ दालनात शुचिर्भूत होऊ न धर्मप्रवचने चालू ठेवलीस तर बरे होईलः

दिव्यचक्र त्याच्या हजारो आऱ्यांसह, धावेसह, मण्यांसह व त्याच्या संपूर्ण भागांसह प्रकट होईल.''

५. ''परंतु पिताजी, चक्रवर्ती सम्राटाची आर्य कर्तव्ये कोणती?''

''प्रिय पुत्रा, तू धर्म-ध्वज, धर्म-पताका (धर्मकेतू) असल्यामुळे, धर्माला (सत्य व सदाचाराच्या नियमाला) तू मान देऊन, आदर देऊन व पूज्यभाव दाखवून, त्यास वंदना करून, पवित्र मानून, त्याचा आधार घेऊन तुझ्या जनतेची, सैन्याची, उमरावांची, दासांची, ब्राह्मणांची व गृहस्थांची, नगरांची व नगरवासियांची, धार्मिक जगताची आणि पशुपक्ष्यांची योग्य काळजी घे व त्यांना संरक्षण दे. तुझ्या राज्यात दुष्कृत्य (अधम्म) घडू नये. तुझ्या राज्यात जे कोणी निर्धन असतील त्यांना धन देण्यात यावे.

''आणि प्रिय पुत्रा, जेव्हा तुझ्या राज्यातील धर्मजीवी माणसे (श्रमण आणि ब्राह्मण) निष्काळजीपणा सोडून, इंद्रियांना उन्मत्त करण्यापासून विरत आत्मशमन करून, प्रत्येकजण स्वतःचे संरक्षण करून वेळोवेळी तुझ्याकडे येतील आणि चांगले काय व वाईट काय, कशाला गुन्हा म्हणावा व कशाला गुन्हा म्हणू नये, काय करावे व काय करू नये, कोणती कृत्ये दीर्घकाळ अथवा अल्पकाळ दुःखाला कारण ठरतील, यांविषयी प्रश्न विचारतील, तेव्हा त्यांना काय सांगायचे आहे ते तू ऐक. तू त्यांना दुष्कृत्य करण्यापासून परावृत्त कर आणि सत्कृत्य हाती घेण्यास त्यांना आज्ञा कर. प्रिय पुत्रा, जगाच्या सम्राटाचे हे आर्य कर्तव्य आहे.''

'तसेच होईल' महाराजाने अभिषिक्त राजाला उत्तर दिले व त्याच्या आज्ञेचे पालन करून सम्राटाचे आर्य कर्तव्य पार पाडले. त्याने अशी वर्तणूक केल्यावर पूर्ण चंद्राच्या आनंदोत्सवाच्या वेळी तो जेव्हा स्नात होऊन उपासना करीत मुख्य श्रेष्ठ दालनात गेला तेव्हा हजारो आरे, धावा, मणी व इतर सर्व भागांसह दिव्यचक्र स्वयं प्रकट झाले. ते पाहिल्यावर राजाच्या मनात आले. ''मला असे सांगण्यात आले होते की, अशा प्रसंगी ज्या राजासमोर दिव्यचक्र पूर्णपणे प्रकट होते तो राजा चक्रवर्ती सम्राट बनतो. मी देखील त्याप्रमाणे जगाचा सम्राट बनतो.''

६. '''मग बंधूंनो, राजा त्याच्या आसनावरून उठला आणि एका खांद्यावरील वस्त्र काढून आपल्या डाव्या हातात त्याने झारी घेतरी आणि उजव्या हाताने दिव्यचक्रावर पाणी शिंपडीत तो म्हणाला, ''हे चक्रदेव !

पुढे गोल फिर. हे चक्रदेवा ! पुढे जा व विजय प्राप्त कर !'

"मग बंधूंनो, पूर्व प्रदेशाकडे धर्मचक्र पुढे गोल फिरत गेले व चक्रवर्ती राजा आपले सैन्य. घोडे, रथ, हत्ती व सेवक यांच्यासह याच्या मागोमाग गेला आणि ज्या कोण्या ठिकाणी, बंधूंनो, ते चक्र जेथे थांबले तेथे विजयी श्रेष्ठ योद्धा असलेल्या राजाने त्याच्या चतुरंग सैन्यासह तळ ठोकला. तेव्हा पूर्व प्रदेशातील प्रतिस्पर्धी राजे सार्वभौम राजाकडे आले व म्हणाले, "यावे हे शक्तिशाली राजा, तुझे स्वागत असो ! हे शिक्तिशाली राजा, हे सर्व तुझे आहे. हे शक्तिशाली राजा, आम्हाला धर्मोपदेश दे !"

तेव्हा सार्वभौम श्रेष्ठ योद्धा असलेला राजा म्हणाला, "तुम्ही कोणत्याही प्राणिमात्राची हत्या करता कामा नये. जे दिले गेले नाही ते तुम्ही घेता कामा नये.

तुम्ही शारीरिक विषयवासना चुकीच्या मार्गाने भागवता कामा नये. तुम्ही खोटे बोलता कामा नये. तुम्ही कसलेच मादक पेय प्राशन करता कामा नये. तुम्ही तुमच्या मालमत्तेचा तुमच्या इच्छेप्रमाणे उपभोग घ्या."

७. मग बंधूंनो दिव्यचक्र पूर्व समुद्रात बुडाले व पुन्हा बाहेर आले व दक्षिण प्रदेशाकडे गोल फिरते गेले.... (आणि पूर्वेला घडले त्याप्रमाणे तेथेही सर्व काही घडले.) आणि अशाच पद्धतीने दिव्यचक्र समुद्रात बुडाले व पुन्हा बाहेर आले आणि पश्चिम प्रदेशाकडे गोल फिरत गेले... आणि उत्तरेकडील प्रदेशाकडे गोल फिरत गेले; आणि तेथेदेखील दक्षिणेत व पश्चिम घडले तसेच घडले.

मग दिव्यचक्र जेव्हा समुद्रसीमा असलेल्या संपूर्ण जगावर विजय मिळवीत पुढे गेले तेव्हा ते राजधानीत परत आले व उभे राहिले, असे की कोणाला ते (न्यायदानाच्या सभागृहापुढे जगाचा सम्राट असलेल्या चक्रवर्ती राजाच्या आतील वाड्याच्या तोंडाशी आपल्या दीप्तीने प्रकाश देत स्थिर केले आहे) असे वाटावे.

८. व बंधूंनो, चक्रवर्ती सम्राट असलेल्या, विजयी श्रेष्ठ योद्धा असलेल्या दुसऱ्या राजाने--- आणि तिसऱ्या--- आणि चौथ्या---- आणि पाचव्या-- आणि सहाव्या--- आणि सातव्या राजानेदेखील अनेक वर्षानंतर, शेकडो, वर्षानंतर, हजारो वर्षानंतर माणसाला अशी आज्ञा केली; "तू जर दिव्यचक्र बुडाले आहे, त्याचे जागेपासून ढळले आहे असे पाहिलेस

तर मला कळव.

"महाराज, तसेच करीन." त्या माणसाने उत्तर दिले.

अशा प्रकारे अनेक वर्षांनी, शेकडो वर्षांनी त्या माणसाने पाहिले की दिव्यचक्र बुडाले आहे. त्याच्या जागेपासून ढळले आहे आणि असे पाहिल्यावर विजेता श्रेष्ठ योद्धा असलेल्या राजाकडे तो गेला व तसे त्याने राजाला सांगितले.

मग (त्या दृढनेमी राजाने जे केले) तेच त्या राजाने केले. आणि सातव्या दिवशी राज्यसंन्याशी पुढे निघून गेल्यावर ते दिव्यचक्र पुन्हा अदृश्य झाले.

मग एका माणसाने राजाकडे जाऊन त्याला तसे सांगितले. तेव्हा दिव्यचक्र अदृश्य झाल्याने राजा चिंताक्रांत झाला व दुःखाने व्यथित झाला. परंतु सम्राट श्रेष्ठ योद्धायाच्या आर्य कर्तव्यासंबंधात त्याने संन्याशी राजाला विचारले नाही. परंतु खरोखर त्याने त्याच्या जनतेवर मनमानीपणाने राज्य केले; आणि अशा प्रकारे त्यांच्यावर जसे राज्य करण्यात आले होते त्याहून वेगळ्या प्रकारे त्यांच्यावर राज्य करण्यात आले, त्यामुळे ज्यांनी सम्राट राजाचे आर्य कर्तव्य पार पाडले होते अशा आधीच्या राजांच्या आधिपत्याखाली जशी त्यांची भरभराट झाली होती तशी त्यांची भरभराट झाली नाही.

मग बंधूंनो, मंत्री व सरदार, खनिजदार, रक्षक व द्वारपाल, तसेच साधुवृत्तीने जगणारे लोक राजाकडे आले व त्याला म्हणाले :

"हे राजा, आधीचे राजे कर्तव्य पार पाडत असताना तुझ्या जनतेवर ज्या पद्धतीने राज्य करीत त्याहून वेगळ्या पद्धतीने तू मनमानीपणाने त्यांच्यावर राज्य करीत असल्याने जनतेची भरभराट होत नाही, सम्राट राजाच्या आर्य कर्तव्याने ज्ञान असलेले मंत्री व सरदार, खनिजदार, रक्षक व द्वारपाल आणि साधुवृत्तीने जगणारे आम्ही श्रमण व ब्राह्मण असे दोन्ही प्रकारचे लोक आता तुझ्या राज्यात आहोत. तेव्हा हे राजा ! कर्तव्याबाबत आमचा सल्ला घे; तू असे विचारल्यावर आम्ही ते कर्तव्य तुला सांगू."

९. मग बंधूंनो, त्या राजाने मंत्र्यांची व इतर बाकी सर्वांची एकत्र परिषद बोलावली व त्यांना सम्राट श्रेष्ठ योद्धयाच्या आर्य कर्तव्याविषयी विचारले व त्यांनी ते त्याला सांगितले. आणि त्याने त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यावर योग्य देखरेख ठेवण्याची व्यवस्था केली. परंतु निर्धनांना त्याने धन दिले नाही व असे न केल्याकारणाने गरिबी सर्वत्र वाढली.

गरिबी अशा प्रकारे जेव्हा भरमसाठ वाढली तेव्हा एका माणसाने जे त्याला देण्यात आलेले नव्हते ते घेतले, त्यालाच लोक चोरी म्हणत. त्याला राजाच्या सेवकांनी पकडून राजासमोर आणले व म्हणाले: 'हे राजा, ह्या माणसाने जे त्याला देण्यात आलेले नाही ते घेतले आहे व ती चोरी आहे." त्यावर राजा त्या माणसाला म्हणाला, "काय रे, हे खरे आहे काय? कोणत्याही माणसाने तुला दिलेले नाही ते तू घेतले आहेस. त्यामुळे लोक ज्याला चोरी म्हणतात ती तू केली आहेस?"

"महाराज, हे खरे आहे."

"परंतु का?"

महाराज, मला जगण्यासाठी कोणतेही साधन नाही ! "तेव्हा राजाने त्या माणसाला धन दिले व म्हटले, "या धनाने तू स्वतःचा निर्वाह कर. तसेच तुझ्या मातापित्यांचे व पत्नी-मुलांचे पालनपोषण करून तुझा चरितार्थ चालव."

१०. मग बंधूंनो, दुसऱ्या एका माणसाने जे त्याला देण्यात आले नव्हते ते चोरी करून घेतले. त्याला त्यांनी पकडले, राजासमोर आणले व राजाला सांगितले.

आणि राजा (आधीच्या माणसाला जसा म्हणाला व त्याने त्याला जशी वागणूक दिली तसा) याही माणसाला म्हणाला व तशीच वागणूक दिली.

११. मग बंधूंनो लोकांनी असे ऐकले की, चोरी करून ज्यांनी त्यांना न दिलेले घेतले होते त्यांना राजा धन देत आहे आणि हे ऐकल्यावर त्यांनी असा विचार केला, आपणास जे देण्यात आले नाही ते आपण चोरी करून घ्यावे. मग एका माणसाने तसे केले आणि त्याला राजाच्या सेवकांनी पकडले. त्याच्यावर आरोप ठेवण्यात आला. तेव्हा चोरी का केली होती असे राजाने त्याला (अगोदरच्याप्रमाणे) विचारले.

"कारण, महाराज, मी माझा चरितार्थ चालवू शकत नाही."

तेव्हा राजाने विचार केला: मी जर कोणी चोरी करून त्याला न दिलेले घेत असेल अशा कोणालाही धन दिले तर त्यामुळे या गोष्टीला पूर्ण पायबंद घातला पाहिजे व त्याला कठोर शिक्षा दिली पाहिजे, त्याचा शिरच्छेद केला पाहिजे.

म्हणून त्याने त्याच्या सेवकांना बोलावले व म्हटले, "तर तुम्ही असे करा. ह्या माणसाचे हातपाय मजबूत दोराने पाठीमागून घट्ट बांधा, त्याच्या डोक्याचे मुंडन करा, जोराजोराने नगारे वाजवून त्याला रस्तोरस्ती, गल्लीबोळांतून सर्वत्र फिरवा त्याला दक्षिण दरवाजातून बाहेर काढून, नगराच्या दक्षिण बाजूस न्या व त्याचा कायमचा बंदोबस्त करा. त्याला परमोच्च शिक्षा द्या, त्याचा शिरच्छेद करा."

"होय महाराज, तसेच करू." त्या सेवकांनी उत्तर दिले व आज्ञा पार पाडली.

१२. तेव्हा बंधूंनो, लोकांनी असे ऐकले की, जो कोणी चोरी करून त्यांना न दिलेले घेतात त्यांना अशा प्रकारे मृत्युदंड मिळतो आणि असे ऐकल्यावर त्यांनी विचार केला :

धारदार तलवारी आपल्याकडे तयार ठेवाव्यात आणि आपणास जे दिले गेले नाही ते आपण ज्यांच्याकडून घेतो–ते त्यास काहीही म्हणतो – त्यांचा आपण शेवट घडवून आणावा, त्यांना परमोच्च शिक्षा द्यावी व त्यांच्या शिरच्छेद करावा.

आणि त्यांनी धारदार तलवारी घेतल्या व गाव, नगर, जनपदे लुटण्यासाठी व महामार्गावर वाटमारी करण्यासाठी ते पुढे आले आणि मग ज्यांना त्यांनी लुटले त्यांना शिरच्छेद करून संपविले.

१३. अशा प्रकारे बंधूंनो, निर्धनांना धन देण्यात न आल्यामुळे गरिबी बेसुमार वाढली, गरिबी बेसुमार वाढल्यामुळे चोरी करण्याचे प्रमाण वाढले, चोरी करण्याचे प्रमाण वाढल्यामुळे हिंसा फोफावली, हिंसा फोफावल्यामुळे प्राणघात ही सामान्य गोष्ट बनली, खून वारंवार झाल्याने त्या माणसांचा जीवनकाल आणि त्यांचे सौजन्य हे दोन्ही ही संपुष्टात आले.

मग बंधूंनो, त्यानंतरच्या काळात माणसांमधील काहींनी त्यांना जे दिले गेलेले नाही ते चोरी करून घेतले आणि इतरांप्रमाणे त्यांच्यावर जरी राजासमोर आरोप ठेवण्यात आला आणि त्यांना विचारण्यात आले की तुम्ही चोरी केली आहे हे खरे का, तेव्हा त्यांनी उत्तर दिली, "नाही महाराज, ते जाणूनबुजून खोटे बोलत आहेत."

१४. अशा प्रकारे निर्धनांना धन देण्यात न आल्यामुळे खोटे बोलणे ही सामान्य गोष्ट होईपर्यंत गरिबी--- चोरी-- हिंसा--- खून--- यात बेसुमार वाढ झाली. तसेच एखाद्या माणसाने दुसऱ्या एखाद्या माणसाविषयी

चहाडी करतांना, ''अशा म्हणत राजाकडे तक्रार केली.

१५. आणि अशा प्रकारे बंधूंनो, निर्धनांना धन न देण्यात आल्यामुळे गरिबी बेसुमार वाढली--- चोरी--- हिंसा--- खून--- खोटं बोलणे--- चहाडी करणे अमर्याद वाढले.

१६. खोटे बोलण्यामुळ व्यभिचार वाढला.

१७. अशा प्रकारे निर्धनांना धन देण्यात आल्यामुळे गरिबी--- चोरी--- हिंसा--- खून--- खोटे बोलणे--- चडाडी करणे--- अनैतिकता बेसुमार वाढली.

१८. बंधुंनो, त्यांच्यामध्ये तीन गोष्टी वेगाने वाढल्या. निषिद्ध नात्यांतर्गत व्यभिचार, दुष्ट लोभ व विकृत हाव. मग या गोष्टी वेगाने वाढल्यावर मातापित्यांविषयीचा आदर नष्ट झाला, साधुवृत्तीच्या माणसांविषयी धार्मिक सद्भावना नष्ट झाली, कुलप्रमुखाविषयी अनादर निर्माण झाला.

१९. बंधूंनो, असा काळ येईल की, तेव्हा त्या लोकांच्या वंशाजांचे आयुर्मान दहा वर्षांचे असेल. या आयुर्मानात माणसांमध्ये कुमारिकांचे विवाहाचे वय पाच वर्षांचे असेल. अशा माणसांमध्ये तूप, लोणी, तिळ, तेल, साखर, मीठ या प्रकारच्या चवी लोप पावतील. दहा अनैतिक वर्तनाने मार्ग अत्याधिक वाढतील अशा मानवप्राण्यांमध्ये नीतीसाठी कोणताही शब्द असणार नाही, नैतिक मार्गदर्शन मिळणे अगदीच दुरापास्त असेल. आज जसा कुटुंबवत्सल मनाच्या माणसांना, धर्माचरण करणाऱ्यांना व जे त्यांच्या कुळाच्या प्रमुख्याला आदर देतात त्यांना आदर दिला जातो व त्यांची प्रशंसा केली जाते, त्याप्रमाणे अशा मानवप्राण्यांमध्ये बंधूंनो, ज्यांच्या मनामध्ये कुटुंबवत्सलतेचा व दयेचा अभाव आहे आणि जे कुलप्रमुखाला कसलाही आदर देत नाहीत त्यांच्या आदर व प्रशंसा करण्यात येईल.

२०. बंधूंनो, अशा मानवप्राण्यांमध्ये, माता किंवा मावशी किंवा मामी किंवा गुरूपत्नी हिच्याशी विवाह करणे निषिद्ध असावे, या प्रकारच्या विचाराची बूज राखली जाणार नाही. शेळ्या-बकऱ्यांप्रमाणे, कोंबड्या-डुकरांप्रमाणे, कोल्ह्या-कुत्र्यांप्रमाणे जगात स्वैचार माजेल.

अशा मानवप्राण्यांमध्ये बंधूंनो, परस्परात तीव्र शत्रुत्व हा नियम होईल. त्यांच्यात तीव्र दुष्टेच्छा, तीव्र वैरभाव, आईने तिच्या मुलाला, मुलाने त्याच्या पित्याला, भावाने भावाला, भावाने बहिणीला, बहिणीने भावाला ठार मारण्याचे देखील भावनातिरेकी विचार येतील. तसे करताना एखादा

खेळाडूला तसे आपला खेळ पाहून वाटते त्याप्रमाणे त्यांना आनंद वाटेल.

जेव्हा नैतिक शक्ती अयशस्वी ठरते व पाशवी शक्ती तिची जागा घेते तेव्हा जे काही घडते त्याचे हे बहुधा अत्यंत सुंदर चित्रण आहे. बुद्धाला अपेक्षित होते ते हे की, प्रत्येक माणसाला नैतिकदृष्ट्या असे शिक्षण द्यावे की, तो स्वतःच सदाचरणाच्या साम्राज्यासाठी एक सैनिक बनेल.

## ८. राज्याची शिथिलता किंवा समाप्ति

एक कायमची हुकूमशाही म्हणून राज्याविषयी असलेला साम्यवाद्यांचा सिद्धांत हा त्यांच्या राजकीय तत्त्वाज्ञानातील एक कमकुवत दुवा असल्याचे साम्यवादी स्वतःच मान्य करतात. 'राज्य' अखेरीस नष्ट होईल, या युक्तिवादाचा ते आश्रय घेतात. त्यामुळे दोन प्रश्नांचे उत्तर त्यांना द्यावे लागेल. ते केव्हा नष्ट होईल? राज्य नष्ट झाल्यावर त्याच्या जागी काय येईल? पहिल्या प्रश्नाला ते निश्चितच कालावधी देऊ शकत नाही. हुकूमशाही अल्प कालावधीसाठी चांगली असेलही आणि लोकशाही सुरक्षित बनविण्यासाठी देखील ती स्वगतार्ह गोष्ट असेलही. पण हुकूमशाहीने तिचे कार्य केल्यावर, लोकशाहीच्या मार्गातील सर्व अडथळे व दगडधोंडे दूर केल्यानंतर व लोकशाहीचा मार्ग सुरक्षित बनविल्यानंतर, तिने स्वतः संपुष्टात का येऊ नये? अशोकने उदाहरण घालून दिले नव्हते काय? त्याने कलिंगविरूद्ध हिंसा केली, परंतु त्यानंतर त्याने हिंसेचा पूर्णपणे त्याग केला. आजच्या आपल्या विजेत्यांनी जर त्यांच्या केवळ बळी ठरलेल्यांनाच निःशस्र न करता स्वतःलाही निःशस्र केले असते तर सर्व जगभर शांतता प्रस्थापित झाली असती. साम्यवाद्यांनी कोणतेही उत्तर दिलेले नाही. राज्य नष्ट झाल्यानंतर त्याची जागा कोण घेईल, हा प्रश्न राज्य केव्हा नष्ट होईल या प्रश्नापेक्षा अधिक महत्त्वाचा आहे. तथापि काही केल्या या प्रश्नाला कोणतेही समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. त्यानंतर हुकूमशाहीच्या जागी अराजक येईल काय? जर तसे असेल तर साम्यवादी राज्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न निरर्थक आहे. जर ते बळाशिवाय कायम राखता येऊ शकत नसेल आणि साम्यवाद्यांना एकत्र ठेवणारे बळ परत काढून घेतल्यावर जर त्याचे पर्यवसान अराजकात होत असेल तर साम्यवादी राज्य काय कामाचे?

बळ काढून घेतल्यावर ते राज्य कायम राखू शकेल अशी एकमेव गोष्ट म्हणजे धर्म होय. परंतु साम्यवाद्यांना धर्म हा वर्ज्य आहे. त्यांचा

धर्माविषयीचा द्वेष इतका खोलवर रूजला आहे की, ते कोणते धर्म साम्यवादाला सहाय्यक आहेत आणि कोणते धर्म तसे नाहीत यांमध्ये भेददेखील करायला तयार नाहीत. सामय्वाद्यांनी त्यांचा ख्रिस्ती धर्माविषयीचा द्वेष बौद्ध धर्मालाही लागू केला. त्या दोहोंमधील फरक तपासून पाहण्यासाठी ते थांबले नाहीत. साम्यवाद्यांनी ख्रिस्ती धर्माविरूद्ध केलेला आरोप दुहेरी होता. ख्रिस्ती धर्माविरूद्ध त्यांचा पहिला आरोप हा होता की, त्याने लोकांना परलोकात नेले आणि इहलोकात त्यांना गरिबी भोगायला लावली. या निबंधातील या आधीच्या भागात बौद्धधर्मापासून घेतलेल्या अवतरणांवरून दिसून येऊ शकेल की असा आरोप बौद्ध धर्माविरूद्ध करता येऊ शकत नाही.

साम्यवाद्यांनी ख्रिस्ती धर्माविरूद्ध केलेला दुसराही आरोप बौद्ध धर्माविरूद्ध करता येऊ शकत नाही. या आरोपाचा सारांश 'धर्म ही लोकांसाठी अफू आहे' या विधानाने देण्यात आला आहे. बायबलमध्ये दिसून येणाऱ्या पर्वतावरील प्रवचनावर हा आरोप आधारलेला आहे. पर्वतावरील प्रवचन गरिबीचे व दुर्बलतेचे उदात्तीकरण करते. ते गरिबांना व दुर्बलांना स्वर्गाचे आश्वासन देते. बुद्धाने आपल्या शिष्यांपैकी अनाथपिंडीक या शिष्याला या विषयावर दिलेले प्रवचन मी पुढे देत आहे.

एकदा भगवान राहत होते तिथे अनाथपिंडिक आला. आल्यावर त्याने भगवंताला वंदन केले व एका बाजूला बसून बसून विचारले, 'कोणत्या गोष्टी गृहस्थाला स्वागतार्ह, आनंदादायी व इष्ट परंतु दुष्यप्राप्य असतात ते भगवंत सांगतील काय?

भगवंतांनी त्यांच्यापुढे मांडलेला तो प्रश्न ऐकून घेतल्यावर म्हटले, 'अशा गोष्टीपैकी पहिली गोष्ट, कायदेशीर मार्गाने संपत्ती मिळविणे ही होय.'

'दुसरी गोष्ट, तुमचे नातेवाईकदेखील त्यांची संपत्ती कायदेशीर मार्गाने मिळवितात का हे पाहणे ही होय.

तिसरी गोष्ट, दीर्घकाळ जगून वृद्धत्वाला पोहोचणे ही होय.

चौथी गोष्ट, सत्य ज्ञानाची प्राप्ती करणे होय.

खरे तर या गोष्टी प्राप्त करण्यासाठी या जगात ज्या स्वागतार्ह, आनंददायी, इष्ट परंतु मिळविण्यासाठी कठीण आहेत अशा चार शर्तीदेखील त्याआधी येतात. त्या म्हणजे विश्वासाची इष्टसिद्धी, सद्‌गुणी वर्तनाची इष्टसिद्धी, उदारपणाची इष्टसिद्धी व ज्ञानाची इष्टसिद्धी.

सद्गुणी वर्तनाची इष्टसिद्धी प्राण घेण्यापासून, चोरी करण्यापासून, व्यभिचारापासून, खोटे बोलण्यापासून व मादक पेय सेवन करण्यापासून अलिप्त ठेवते.

जीवनात द्रव्यलोभाच्या कलंकापासून मनाने मुक्त असलेल्या, दानशूर, मुक्तहस्त, दान देण्यात आनंद मानणाऱ्या, ज्याला दान मानावे व जो दानदानास वाहिलेला आहे अशा गृहस्थामध्ये औदार्याची इष्टसिद्धी वसत असते.

ज्ञानाच्या इष्टसिद्धीत कशाचा अंतर्भाव होतो? एखादा गृहस्थ असा असेल की त्याच्या मनावर द्रव्यलोभ, हाव, दुष्टइच्छा, आळस, सुस्ती, विचलन व मनःक्षोभ यांनी पगडा बसवलेला असतो. तसेच तो चुकीची कृत्ये करत असतो व जी करायला पाहिजेत तिकडे दुर्लक्ष करत असतो व तसे केल्याने ते सुखापासून, मानापासून वंचित झालेला असतो हे तो जाणतो.

द्रव्यलोभ, लालसा, दुष्टइच्छा, आळस, सुस्ती, विचलन, मनःक्षोभ व संशय हे मनाचे कलंक आहेत. ज्या गृहस्थाची अशा मनाच्या कलंकापासून मुक्तता होते तो महाज्ञान, प्रचंड ज्ञान, स्वच्छ दृष्टी व पूर्ण ज्ञान प्राप्त करतो.

अशा प्रकारे मोठ्या उद्योगशीलतेने मिळवलेली, बाहुसामर्थ्याने प्राप्त केलेली व निढळाच्या घामावर मिळविलेली संपत्ती कायदेशीर मार्गाने व न्याय्य मार्गाने संपादन करणे ही मोठी इष्टसिद्धीस आहे. तोच गृहस्थ स्वतःला सुखी व आनंदी बनवितो व पूर्ण समाधानी होतो. तसेच त्याचे आई-वडील, पत्नी, मुले, सेवक व मजूर, मित्र व सोबती यांना देखील सुखी व आनंदी बनवितो व त्यांना देखील पूर्ण समाधान देतो.

बळ काढून घेतल्यावर साम्यवाद कायम राखण्यासाठीचा एक अंतिम उपाय म्हणून रशियन लोक बौद्ध धर्माकडे अजिबात लक्ष देत नाहीत असे दिसते.

रशियन लोकांना त्यांच्या साम्यवादाचा गर्व आहे. परंतु ते एक गोष्ट विसरतात की, सर्व आश्चर्यातील आश्चर्य म्हणजे बुद्धाने संघामध्ये हुकूमशाहीशिवाय साम्यवाद प्रस्थापित केला. तो अतिशय छोट्या प्रमाणातील साम्यवाद असेलही, परंतु तो हुकूमशाहीशिवाय असलेला साम्यवाद होता व हे आश्चर्य लेनिनलासुद्धा करता आले नाही.

बुद्धाला मार्ग वेगळा होता. त्याचा मार्ग माणसाचे मन बदलण्याचा, माणसाचा स्वभाव बदलण्याचा होता, जेणेकरून माणूस जे काही करतो ते

तो स्वेच्छेने व बळाचा अगर जबरदस्तीचा वापर न करता करील. माणसाचा स्वभाव बदलण्याची त्याची मुख्य साधने त्याचा धम्म व त्याच्या धम्माची अखंड शिकवण ही होती. लोकांना जे करायला आवडत नाही ते त्यांना करायला लावण्यासाठी लोकांवर बळजबरी करणे हा बुद्धाचा मार्ग नव्हता, मग ती कृती त्यांच्या भल्यासाठी का असेना. त्याचा मार्ग लोकांचा स्वभाव बदलण्याचा होता, जेणेकरून त्यांनी जे अन्यथा केले नसते ते स्वेच्छेने करतील.

रशियातील साम्यवादी हुकूमशाहीने अर्थातच आश्चर्यकारक यश मिळविले आहे, असा दावा करण्यात येतो. हे अर्थातच कोणीही नाकारू शकत नाही. म्हणूनच तर मी म्हणतो की रशियन हुकूमशाही सर्व मागास देशांना उपयुक्त ठरेल. परंतु हा कायमच्या हुकूमशाहीसाठी युक्तिवाद नाही. मानवतेला केवळ आर्थिक मूल्यांची आवश्यकता नाही. आध्यात्मिक मूल्ये टिकवून ठेवण्याची देखील तिला आवश्यकता आहे. कायमच्या हुकूमशाहीने आध्यात्मिक मूल्यांकडे लक्ष दिलेले नाही आणि तसे लक्ष देण्याची तिची इच्छा नाही. कार्लाईलने ती चूक केली. कारण माणसाला भौतिक सुखांची गरज असते. परंतु साम्यवादी तत्त्वज्ञानादेखील तितकेच चूक असल्याचे दिसून येते. कारण त्यांच्या तत्त्वज्ञानाचे ध्येय डुकरांना धष्टपुष्ट करण्याचेच दिसते. जणू काय माणसांमध्ये व डुकरांमध्ये कसला फरकच नाही. माणसाचा भौतिक त्याचप्रमाणे आध्यात्मिक विकास झाला पाहिजे. ज्याचा सारांश फ्रेंच राज्यक्रांतीने सहभाव, स्वातंत्र्य व समता या तीन शब्दांत दिला आहे. त्या नवीन पायावर समाजाची उभारणी करण्याकडे समाज वाटचाल करीत आहे. या घोषणेमुळे फ्रेंच राज्यक्रांतीचे स्वागत झाले. परंतु समता प्रस्थापित करण्यात ती अपयशी ठरली. आम्ही रशियन क्रांतीचे स्वागत करतो. कारण समता प्रस्थापित करणे हे तिचे ध्येय आहे. परंतु तिला अवास्तव महत्त्व देता येणार नाही. सहभाव वा स्वातंत्र्य याशिवाय समतेला कसलाही अर्थ नाही. बुद्धाचा मार्ग अनुसरला तरच या तिन्ही गोष्टी एकत्र राहू शकतील असे दिसते. साम्यवाद केवळ समता ही एकच गोष्ट देऊ शकतो, (समता, सहभाव व स्वातंत्र्य या) सर्व गोष्टी देऊ शकत नाही.

✡✡✡

# बौद्ध धर्माचा उदय आणि ऱ्हास

(खाटमांडूची जागतिक बौद्ध परिषद आटपून परत येतांना बनारस हिंदू विश्वविद्यालयात विद्यार्थिवर्गासमोर व आचार्यगणांसमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उपरोक्त विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. दि. २५-११-१९५६ च्या सकाळी आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानात बाबासाहेबांनी अत्यंत विद्वत्तापूर्ण विवेचन केले होते. तेच हे व्याख्यान-)

बौद्ध धर्माच्या उत्पत्तीसंबंधी लोकात पुष्कळच अज्ञान दृष्टीस पडते. प्राचीन भारताचा त्रयस्थपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना बुद्धपूर्वकालात दोन संघर्ष आढळतात. पहिला संघर्ष आर्य व नाग लोकात आणि दुसरा ब्राह्मण व क्षत्रियात.

सध्या हिंदू म्हणून ओळखले जाणारे पुष्कळसे लोक नागवंशीय आहेत. ज्या नाग लोकांनी आर्यांपूर्वी भारतात वस्ती केली होती ते आर्यांपेक्षा अधिक सुसंस्कृत होते. त्यांना आर्यांनी जिंकले, परंतु एवढ्यावरून आर्यांची संस्कृती नाग लोकांच्या संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ ठरत नाही. आर्यांच्या विजयाचे कारण म्हणजे त्यांचे वाहन. आर्य घोड्यावर स्वार होऊन लढत तर नाग लोक पायदळी लढत. आर्य-नागांमधील लढा प्राणपणाने लढला गेला. महाभारतातील खांडववन व सर्पसत्र या कथांवरील कल्पनेचे परिवेष्टण दूर केले तर या आर्य नाग युद्धाचे भयानक स्वरूप आपल्या दृष्टीस पडते. आर्यांनी खांडववन दहनासारखी म्हणजे Scorched Earth Policy ची कृत्ये

करून नागाची ससेहोलपट चालवविली. या विध्वंसातून अगस्ती ऋषींने एका नागाला वाचविले अशी एक कथा आहे. कथेत अतिशयोक्ती असली तरी नागांच्या वसाहती संपूर्ण नष्ट करण्यासाठी आर्य कसे झगडत होते हे त्यावरून दिसून येते. पराभवामुळे नागांच्या मनात आर्यांविषयी द्वेष वसत होता. परीक्षित राजाचा प्राण घेणारा तक्षक हा कोणी सर्प नसून एक नागवंशीय पुढारी होता. आर्य लोकांच्या मनात नागांसंबंधी वसत असलेल्या द्वेषाचे उदाहरण म्हणून कर्ण व अनंत ह्यांचे संभाषण सांगता येईल. कर्णार्जुन युद्धापूर्वी अनंत हा नागवंशीय योद्धा कर्णाला भेटला आणि आपण अर्जुनाविरूद्ध सहाय्य करू असे आश्वासन देऊ लागला. कर्णाने ते देऊ केलेले सहाय्य नाकारले. कारण कर्ण आर्य होता आणि अनंत हा नाग होता. आर्यांनी आपापसातील युद्धासाठी नागांचे सहाय्य घेणे निषिद्ध होते.

बौद्धपूर्व काळातील दुसऱ्या संघर्षाचे स्वरूप ब्राह्मण क्षत्रियातील संघर्ष होय. या लढ्याची वर्णने पुढे पुराणातून आलेली आहेत. त्याचप्रमाणे मनूने आपल्या स्मृतीत क्षत्रियांनी ब्राह्मणांना आदराने का वागविले पाहिजे याची कारणे देताना पूर्वकालीन ब्राह्मण क्षत्रियांच्या संग्रामाचा उल्लेख केला आहे.

आर्य व नाग किंवा ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यामधील संघर्ष चालू असताना ब्राह्मणांनी ऋग्वेदात पुरूषसूक्ताचा अंतर्भाव केला असावा. पुरूषसूक्तापूर्वी चातुर्वर्ण्यातील चारही वर्ण एकाच समान पातळीवर होते. पुरूषसूक्ताने उच्चनीचतेचे तत्व प्रथमतः भारतीय समाजात आणले. ब्राह्मण-क्षत्रियाच्या संघर्षाच्या काळात भगवान बुद्धांने भारतीय जीवनात प्रवेश केला ज्या शाक्य कुळात गौतमाचा जन्म झाला होता त्या शाक्यांचे गणराज्य लोक-शाहीप्रधान होते. ह्या लोकशाहीच्या परंपरेत वाढलेल्या गौतमास चातुर्वर्ण्य अमान्य होते. सध्याच्या स्वरूपातील बौद्ध धर्म हा एक नानाविध सिद्धान्तांचा महासागरच झाला आहे. परंतु बौद्ध धर्माचा मध्यवर्ती सिद्धान्त अथवा बुद्धमत हे समतेवरच आधारलेले आहे. बौद्ध धर्माचा स्वीकार करणारे लोक बहुअंशी नागवंशीय आणि चातुर्वर्ण्यात हीन समजले जाणाऱ्या वर्गापैकी होते. नागांची बुद्धप्रीती मुचलिंद नागाच्या कथेवरून सिद्ध होते. मुचलिंदाचे अग्निहोत्री काश्यपाशी वैर होते. परंतु कश्यपाकडे आतिथ्यसाठी

आलेल्या बुद्धाचा तो एक सेवक बनला. बौद्ध धर्माच्या अभिवृद्धीचे कारण शूद्रांनी बौद्ध धर्माचा बहुसंख्येने केलेला स्वीकार. बौद्ध वाङ्मयातील विशेषतः थेर व थेरीगाथेच्या आधारे हे सिद्ध करता येईल.

बौद्धधर्म ही एक हिंदुधर्माचीच शाखा आहे. अशा मताचा प्रचार अलीकडे फारच बोकाळला आहे. वस्तुतः बौद्धप्रणित धर्म वैदिकधर्माच्या समकालीन होता. तो वैदिक अथवा ब्राह्मणीधर्माहून अतिशय भिन्न होता. वैदिक लोक वेदग्रंथांना प्रमाण मानीत, तर बुद्धाचा वेदांनाच विरोध होता. कालामसुत्तामध्ये बुद्धाने माणसाला विचार स्वातंत्र असले पाहिजे आणि वेदांनी माणसासाठी सदासर्वकाळ टिकणारा विचार करून ठेवला नाही असे प्रतिपादले आहे. बुद्धांच्या वेदप्रामाण्यावरील आघाताचा पुढील काळातील हिंदूंच्या भगवद्गीतेसारख्या ग्रंथावरही परिणाम झाला आहे. वेदपाठकांची गीतेने एके ठिकाणी बेडूक म्हणून संभावना केली आहे. बुद्धाने वेदांना वाळवंट म्हटले आहे. वेदांमध्ये प्राधान्याने इंद्रादि देवतांना उमदे घोडे, तेजस्वी शस्त्रास्त्रे, शत्रूंवर विजय इत्यादी ऐहिक सुखोपभोगासाठी केलेल्या प्रार्थना आहेत. त्यात उदात्त नीतितत्त्वांची शिकवण नाही, म्हणून बुद्धांने त्याचा धिक्कार केला.

बुद्धांचा समकालीन धर्मावर दुसरा आघात म्हणजे यज्ञसंस्थेवरील गाई-बैलांचे बळी देऊन तुम्हाला कोणते उच्च श्रेय लाभणार आहे असा त्याचा यज्ञिकांना प्रश्न असे. यज्ञसंस्थेवरील बुद्धांच्या टीकेमुळे हिंदूंना इंद्रवरूणादी आद्य देवतांचा त्याग करावा लागला. थोडेसे विषयांतर करून तुम्हास मी हे विचारतो की, हिंदुधर्मात ईश्वराची देवाची कल्पना तरी काय आहे? काशीतील तुमचा पूजनीय महादेव देव मानावा तर त्याचे लग्नही होते व तो आपल्या बायकोबरोबर नाचतोही! ब्रह्माविष्णूचीही तीच कथा. यांना काय देव म्हणायचे? सामान्य माणसाला सुद्धा आज लाज वाटेल अशी दुष्कृत्ये त्यांच्या हातून घडल्याचे तुमची पुराणेच सांगतात. असा एकतरी देव दाखवा की ज्याचे निश्कलंक चारित्र्य आजच्या माणसाला आदर्शवत व अनुकरणीय वाटेल. हिंदूंचे देव म्हणजे राजांची कुलदैवते, त्यांचे पराक्रम म्हणजे राजांचे पौरोहित्य मिळविण्यासाठी ब्राह्मणांनी रचलेली त्यांच्या देवतांच्या खुशामतीची पुराणे! इंद्र, कृष्ण हे काय देव? ऋग्वेदाच्या शेवटच्या भागात

इंद्रपत्नीने इंद्रास मोजलेल्या शिव्या वाचून पाहा! दुर्योधन संपूर्ण वज्रदेही होऊ नये व गदायुद्धात भीमास यश मिळावे म्हणून कृष्णाने योजलेले कपटनाटक पाहा! तुमचा शेजारी असे तुमच्याशी वागू लागला तर तुम्ही त्याला काय म्हणाल? असो. बुद्धांने पशुहत्येची निर्भर्त्सना केली आणि यज्ञाचे वैफल्य जनतेस पटवून दिले म्हणूनच ब्राह्मणांना आपले प्राचीन याज्ञिक आचार सोडावे लागले.

आश्रमव्यवस्थेसंबंधीही बुद्धांचे मत प्रचलित वैदिक धर्मापेक्षा वेगळे होते. ब्राह्मणाच्या मते ब्रह्मचर्य आश्रमानंतर गृहस्थाश्रम स्वीकारणे आवश्यक होते. बुद्धांच्या मते ब्रह्मचर्यानंतर परिव्रज्या स्विकारण्यास प्रत्यवाय नव्हता. ब्रह्मचर्याचा मूळचा अर्थ ज्ञानार्जनाची अवस्था; अविवाहित अवस्था हा त्यास नंतर चिकटविलेला अर्थ आहे. ब्राह्मणांनी गृहस्थाश्रमाचा काळ वाढविण्यासाठी त्याला वानप्रस्थाश्रम जोडला. ब्रह्मचर्यानंतर संन्यास (परिव्रज्या) स्वीकारण्यास ब्राह्मणाची हरकत होती. अकराशे वर्षांनी कुमारिल भट्टाने बुद्धांवर घेतलेल्या आक्षेपात बुद्धांच्या परिव्रज्जेच्या स्वातंत्र्यावर भर दिलेला आहे.

बुद्धांचा वैदिकधर्माशी चौथा विरोध चातुर्वर्ण्याबाबत होता. त्याचे शिष्य-कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या सर्व जातीतील होते. आपल्या शिष्यांत उच्चनीचतेच्या भावनेला जागा राहू नये या बाबतीत तो अत्यंत दक्षता बाळगीत असे. आपल्या चुलत भावांना आपल्या क्षत्रियत्वाचा अभिमान वाटू नये म्हणून त्यांच्या समवेत आलेल्या न्हावी असलेल्या उपालीस प्रथम दीक्षा दिली. ज्याची दीक्षा प्रथम तो त्यानंतर दीक्षा घेणाऱ्यास वंद्य समजला जाई, म्हणून क्षत्रिय शाक्यांना उपाली ह्या त्यांच्या पर्वाश्रमीच्या नापित सेवकास अभिवादन करावे लागे. आपल्या जीवनाच्या शेवटच्या दिवसात चुंद या हीन जातीच्या समजला जाणाऱ्या लोहाराच्या घरचे अन्न, प्रकृतीस अनिष्ट आहे असे समजूनही बुद्धांने ग्रहण केले आणि सामाजिक समतेसाठी स्वप्राणाचे मोल दिले, असे चातुर्वर्ण्यविरोधी प्रसंग बुद्धाच्या जीवनात अनेक दाखविता येतील. तो आपल्या संघाला सागराची उपमा देई. ज्याप्रमाणे सागरात मिळाल्यावर नदीची पृथगात्मता, अलिप्तता राहत नाही आणि सर्व पाणी एकरूप होते, त्याप्रमाणेच संघात येणाऱ्या भिन्नवर्णीय भिक्खूंचे वर्ण

वैशिष्ट्य नष्ट होते. जैनमतालाही चातुर्वर्ण्य निषिद्ध होते, परंतु त्या मुद्यावर भांडण करायला किंवा विरोध करायला ते सिद्ध नव्हते. बुद्ध मात्र आपल्या मुद्याबाबत गुळमुळीत मौन कधीच धारण करीत नसे. आपल्या धर्माचे आपण वीर आहोत आणि त्याच्या स्थापनेसाठी आपणाला अज्ञानाशी झगडावे हे लागणारच असे त्याचे मत होते. बुद्धांची ही चातुर्वर्ण्यविरोधी तीव्रता ब्राह्मणांच्या मनात सदैव डाचत राहिली. म्हणूनच चातुर्वर्ण्याविषयी मूक असलेल्या निरीश्वरवादी सांख्याचा कपिल मुनीस त्यांनी आपले म्हटले, बुद्धाशी सदैव वैर मांडले.

बुद्धांच्या वैदिक धर्माला पाचवा विरोध देव आणि आत्मा यांच्या अस्तित्वाबाबतचा होता. बुद्धांच्या मते सर्वशक्तिमान, सर्वज्ञ, सर्वव्यापी, न्यायी आणि प्रेममय अशा देवाचे अस्तित्व ज्ञानाची साधने जी पंचेन्द्रिये आणि तर्क यांच्या सहाय्याने सिद्ध करता येत नाही. शिवाय धर्माचा उद्देश दुःखपरिहार असा आहे. देव मानल्याने दुःख कमी होत नाही. माणसाने दुसऱ्या माणसाशी कसे वागावे म्हणजे सर्व माणसे सुखी होतील, हे शिकविणे हे धर्माचे मुख्य कार्य आहे. म्हणून धम्माचा देवाशी संबंध येत नाही देवाचे अस्तित्व केवळ पोकळ तर्कावर Speculation आधारलेले आहे. आणि या अस्तित्वाच्या पोकळ श्रद्धेतून पूजा, प्रार्थना, पुरोहित, इत्यादी अष्टांग मार्गातील समादिट्ठीला घातक अशा खुळ्या समजुतीचे Speculation आधारलेले आहे. आणि या अस्तित्वाच्या पोकळ श्रद्धेतून पूजा, प्रार्थना, पुरोहित, इत्यादी अष्टांग मार्गातील समादिट्ठीला घातक अशा खुळ्या समजुतीचे Superstition पेच फुटते. माणसाचे परस्पर संबंध प्रज्ञा-शील-करूणा व मैत्री यांनी नियंत्रित होण्याऐवजी पावित्र्य, उच्चनीचता अशासारख्या भ्रामक समजुतींनी नियंत्रित होतात. देवाच्या अस्तित्वावरील बुद्धांचे आक्षेप केवळ व्यावहारिक दृष्टिचेच होते असे नाही. 'पतिच्च समुत्पाद' या त्यांच्या सिद्धान्तात देवाच्या अस्तित्वावर सर्वसामान्य तार्किक स्वरूपाचे आक्षेप घेतलेले आहेत. या सिद्धान्ताप्रमाणे विश्व देवाने निर्मिले की नाही हाही मुख्य प्रश्न नाही. मुख्य प्रश्न असा आहे की, देवाने जग कसे निर्माण केले? देवाच्या अस्तित्वाचे मंडन किंवा खंडन या प्रश्नाच्या उत्तराने होईल या दृष्टीने महत्वाचा प्रश्न असा की, देवाने हे जग अभावातून निर्मिले की पूर्वी

अस्तित्वात असलेल्या कशातून तरी निर्मिले? काहीच नव्हते यातून काहीतरी निर्मिले या गोष्टीवर माणसाच्या बुद्धीला विश्वास ठेवता येत नाही. जर या तथाकथित देवाने हे जग जर पूर्वी काहीतरी असलेल्यातून निर्मिले असेल तर देवाला आद्यनिर्माता किंवा आदिकारण म्हणता येणार नाही. एकंदरीत कारण किंवा अस्तित्वासंबंधीची विचारसरणी तर्कदृष्ट असल्यामुळे देवावरील श्रद्धा बुद्धांच्या समादिठ्ठी प्रधान धम्माला अमान्य आहे.

वेदान्तातील मोक्ष सिद्धान्त म्हणजे आत्म्याने ब्रह्मात विलीन होणे. यालाही तर्कदृष्ट ठरवून आणि मानवी जीवन सुखी करण्याच्या दृष्टीने निरूपयोगी म्हणून बुद्धांने विरोध केला आहे. ब्रह्मविषयक बुद्धांची विचारसरणी त्याच्या विशिष्ट व भारद्वाज या दोन ब्राह्मणांशी झालेल्या संवादात व्यक्त झाली आहे. बुद्धांचे आत्म्याच्या अस्तित्वावरील व्यावहारिक दृष्टीने आक्षेप त्याच्या देवाच्या कल्पनेवरील आक्षेपासारखे आहेत, शिवाय तो आत्म्याचे म्हणून समजले जाणारे व्यापार नामरूप या सिद्धान्ताच्या आधारे स्पष्ट करून दाखवितो. कायेच्या उत्पत्तीबरोबरच जाणिवेचा Consciousness प्रारंभ होतो. इच्छात्मक, भावनात्मक आणि विचारात्मक कार्ये ही जाणिवेचीच आहेत, तेव्हा आत्मा हे वेगळे तत्व गृहीत धरण्याची आवश्यकता उरत नाही.

अशा रीतीने वैदिकधर्माशी विरोध असणाऱ्या बौद्धधर्माचा पाडाव करण्यासाठी ब्राह्मणांनी भल्याबुऱ्या सर्वप्रकारच्या साधनांचा उपयोग केला. बौद्ध धर्म ज्या गोष्टीमुळे लोकप्रिय झाला त्या गोष्टी आपल्या पूर्वापार धर्मास संमत नसल्या तरी त्यांचा त्यांनी उपयोग केला. या प्रचारपद्धतीस अनुसरूनच वेरूळच्या बौद्ध लेण्याजवळ त्यांनी आपल्या ब्राह्मी लेणी कोरल्या. वस्तुतः ब्राह्मण हा गृहस्थाश्रमी अग्निहोत्र हे त्याचे नित्यव्रत. त्याला परिव्राजित भिक्खूसारखे गुहेत राहण्याचे कारण नव्हते. भिक्खूंना पावसाळ्याच्या तीन महिन्यांत कुठेतरी निवाऱ्याच्या जागी वास करण्याचा बुद्धांचा आदेश होता. त्यामुळे त्यांना लेण्याची आवश्यकता होती. गृहस्थाश्रमी ब्राह्मणाला ती तशी नव्हती. परंतु बौद्ध लेण्यांकडे उपासकांचा मोठा मेळावा आकृष्ट होतो म्हणूनच केवळ त्यांच्या लेण्यांच्या बाजूला आपली लेणी कोरून आपल्या धर्माकडे उपासक ओढून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

बौद्ध धर्माच्या ऱ्हासाचे मुख्य कारण म्हणजे हिंदू पंडित सांगतात

त्याप्रमाणे कुमारिल भट्टाने किंवा शंकराचार्य इत्यादिंनी बुद्धमतांचा वाग्युद्धात केलेला पराभव हे नव्हे! कारण दोघांनीही बुद्धांच्या शिकवणुकीचे मध्यवर्ती सिद्धान्त की जे सामाजिक समता, जगातील दुःख-परिहारासाठी प्रत्येक व्यक्तीचे मतपरिवर्तन, नीतितत्त्वांची सामाजिक जीवनातील प्रतिष्ठापना, बुद्धवाद इत्यादी होते त्यावर या हिंदू पंडितांनी मुळीच आघात केलेला नाही. या दोघाही पंडितानंतर बौद्ध धर्म भारतात कित्येक वर्षे समृद्धावस्थेत होता. बौद्ध धर्माच्या ऱ्हासाचे मुख्य कारण म्हणजे ज्या भिन्न संस्कृतीच्या व भिन्न सांस्कृतीक पातळीच्या लोकांमध्ये त्याचा प्रचार झाला, त्यांच्या आचारांची व समजुतीची बौद्ध धर्मावार झालेली अनुचित प्रतिक्रिया भारतातील बौद्ध धर्मावर झालेला सर्वात मोठा आघात म्हणजे इस्लामी आक्रमणाचा. भारताकडे वळताना मुसलमान आक्रमकांना जे परधर्मी लोक भेटले ते बौद्ध धर्मीयच होते. त्यांच्या भाषेत मूर्तीला 'बुत्' असे म्हणत. 'बुतशिकन' म्हणजे मूर्तिभंजन करणे. जिथे जिथे बुद्धांच्या मूर्ती त्यांना आढळल्या त्यांचा त्यांनी नायनाट करण्याचे धोरण स्वीकारले, हे त्यांचा त्यांच्या गाझीपणाचेच लक्षण होते. हिंदूपेक्षा बौद्धांवर चढविलेले हल्ले अधिक हिंस्र व विध्वंसक स्वरूपाचे होते. त्यांनी केलेल्या बौद्ध भिक्खूंच्या कत्तलीने अकरा ते तेराव्या शतकापर्यंतची इतिहासाची पाने रक्ताने रंगलेली आहेत. नालंदासारख्या जगतविख्यात बौद्ध विद्यापीठाचा त्यांनी पूर्ण नाश केला. हिंदूप्रमाणे बौद्धांमध्ये धर्मप्रचाराचे पिढीजात काम करणारा ब्राह्मणासारखा वर्ग नसल्याने भिक्खूंच्या कत्तलीनंतर बौद्ध धर्माचा झपाट्याने ऱ्हास होऊ लागला. सत्याचाही कधी कधी पराभव होतो ह्याचे हे एक उदाहरण आहे. आज त्यानंतर सहाशे वर्षांनी भारताला बुद्धांची आठवण होत आहे. आज जर भारताने बुद्धांच्या विचारसरणीचा स्वीकार केला नाही तर त्याचे भवितव्य काही ठीक नाही!

**(प्रबुद्ध भारत दि. २४-८-१९५७)**

✡✡✡

# प्रबुद्धभारत पुस्तकालय आणि प्रकाशन व्यवसाय

| | | |
|---|---|---|
| १. | भारताचे संविधान | २००/- |
| २. | भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म | १५०/- |
| ३. | माझी आत्मकथा | ७०/- |
| ४. | क्रांती आणि प्रतिक्रांति | ५०/- |
| ५. | माहितीचा अधिकार | ८०/- |
| ६. | ॲट्रोसिटी ॲक्ट | ७०/- |
| ७. | राज्य आणि अल्पसंख्यक दलित | ५०/- |
| ८. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची गाजलेली भाषणे | ५०/- |
| ९. | कबीर जीवन दर्शन | ७०/- |
| १०. | विद्यार्थ्यांनो जागृत व्हा.... | ७०/- |
| ११. | शेतकऱ्यांचा असूड | ३०/- |
| १२. | गुलामगिरी | ३०/- |
| १३. | हिंदु कोड बिल | ७०/- |
| १४. | पुणे करार | ६०/- |
| १५. | देवळाचा धर्म धर्माचे देवळे | २०/- |
| १६. | क्षत्रिय मराठे | २०/- |
| १७. | शुद्र पुर्वी कोण होते? | १००/- |
| १८. | बौद्ध पुजापाठ | ५/- |
| १९. | मी रमाई | ३०/- |
| २०. | जाती प्रथेचे विध्वंस | ५०/- |
| २१. | अण्णाभाऊ साठे- जिवन दर्शन | ७०/- |
| २२. | संविधान सभेतील भाषणे आणि चर्चा | ५०/- |
| २३. | भारतीय जाती | २०/- |
| २४. | रिडल्स हिंदुजम | २०/- |
| २५. | बुद्ध आणि कार्ल मार्क्स | २०/- |
| २६. | जातक खंड भाग १, २, ३ | १५०/- |
| २७. | रुपयाला प्रश्न | २००/- |
| २८. | मिलींद प्रश्न | १५०/- |
| २९. | हिंदुत्वादाचे कोडे | १५०/- |
| ३०. | संत गाडगे बाबा आणि जीवनदर्शन | ५०/- |
| ३१. | महाराष्ट्र राज्याचे विषमतेवादी धोरणे | ५०/- |
| ३२. | डॉ. आंबेडकर यांचे भाषाप्रांत वर विचार | ३०/- |
| ३३. | संत गाडगेबाबा | ३०/- |
| ३४. | श्यामची आई | ७०/- |
| ३५. | देशांचे दूश्मन | ३०/- |
| ३६. | बुद्ध वंदना | १०/- |
| ३७. | शिक्षणाचा अधिकार | ४०/- |
| ३८. | बहुजन नायक काशीराम | ७०/- |
| ३९. | भ्रष्टाचार आणि जनलोकपाल विधेयक | ५०/- |
| ४०. | गौतम बुद्धाचे चरित्र | ७०/- |
| ४१. | अस्पृश्य मूळचे कोण | ७०/- |
| ४२. | संत रविदास | ६०/- |